# पंढरी संचार


pandharisanchar.com

RNI-MAH-MAR/1499/2000

• पंढरपूर • रविवार, २२ सप्टेंबर २०२४

• किंमत ₹ ४ • पाने : ८

• वर्ष २९ • अंक - १२७


द्वेष, अहंकार, पैशाच्या मस्तीत गुरफटली निवडणूक ! PII





23 तारखेला राज्यभर रास्ता रोको!- आमदार गोपीचंद पडळकर PIII


## परिचारक भालके एकत्र आल्याने पंढरपुर तालुक्यातील

# राजकीय समीकरणे बदलणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क


**पंढरपूर** : माजी आमदार प्रशांत परिचारक व विठ्ठल कारखान्याचे माजी चेअरमन भगीरथ भालके हे राजकारणात एकमेका चे विरोधक आहेत. मात्र शनिवारी मंगळवेढ्यात झालेल्या एका कार्यक्रमात माजी आमदार प्रशांत परिचारक व माजी चेअरमन भगीरथ भालके एकत्र आले असल्याचे दिसून आले आहे. यामुळे पंढरपूर तालुक्यात आगामी राजकीय समीकरणे बदलणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होऊ लागली आहे. पंढरपूर तालुक्यात गेल्या अनेक वर्षांपासून परिचारक यांचा पांडुरंग परिवार व भालके यांचा विठ्ठल परिवार एकमेका विरोधात राजकारण करत आहेत. परिचारक व भालके गेल्या वीस पंचवीस वर्षात एकत्र आलेले नाहीत. मात्र आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर पंढरपूर तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलत असून पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघात निवडणूक लढविण्यासाठी अनेकजण इच्छुक आहेत. विद्यमान आमदार समाधान आवताडे माजी आमदार प्रशांत परिचारक, मनसेचे नेते दिलीप धोत्रे, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतनाना देशमुख, माजी उपनगराध्यक्ष नागेश भोसले, भैरवनाथ शुगरचे व्हाईस चेअरमन अनिल सावंत, भगीरथ भालके निवडणूक लढविण्याची तयारी सुरू केली आहे. यासाठी परिचारक व भालके यांनी बैठकाचे सत्र सुरू केले आहे. भालके यांनी पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यात जन आशीर्वाद यात्रा सुरू करून मतदारांशी संपर्क सुरू केला आहे. तर परिचारक यांनी



पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठकावर भर दिला आहे. आमदार अवताडे यांनी वाड्यावर जाऊन मतदारांच्या गाठीभेटी घेऊन अडीअडचणी जाणून घेण्यास सुरुवात केली आहे. पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघात निवडणुकीची जोरदार मोर्चे बांधणी सुरू झाली आहे. गेली अनेक वर्ष एकमेकांचे कट्टर असलेले परिचारक व भालके मंगळवेढ्यातील एका कार्यक्रमात दोघे एकत्र आले आहेत. भालके यांनी कार्यक्रमात परिचारक यांचा भावी आमदार असा उल्लेख केला आहे. यामुळे आगामी निवडणुकीत भालके यांची साथ परिचारक यांना मिळणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. परिचारक व भालके दोन्ही एकत्र आले असल्याने आता पंढरपूर तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलणार आहेत.


## » At a Glance

### कुरनूर धरण उजनीच्या पाण्याने भरा



**अक्कलकोट** : अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात यंदा अत्यल्प पाऊस झाले आहे. सध्या तालुक्यात पिण्याची पाण्याची तीव्र टंचाई भासत आहे. दुधनी, मैंदर्गी व अक्कलकोट नगरपरिषद या शहरांचा पाणीपुरवठा कुरनूर धरणावर अवलंबून आहे. त्यासाठी कुरनूर धरण 100% भरून घेण्यात यावे व आठ कोल्हापूर पद्धतीचे बंधारे देखील भरून घेण्यात यावेत अशी मागणी अक्कलकोटचे माजी मंत्री व माजी आमदार सिद्धारामजी म्हेत्रे यांनी सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद व अधिक्षक अभियंता भीमा कालवा मंडळ सोलापूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

### सीना नदीवरील बंधाऱ्याची दारे टाकण्याची गरज



**करमाळा** : करमाळा तालुक्यात सीना नदीवर संगोबा, पोटेगाव, तरटगाव व खडकी येथे कोल्हापूर पद्धतीचे लघु पाठबंधारे आहेत. या बंधाऱ्यातील पाण्यावर या भागातील शेती अवलंबून आहे. बंधारा पूर्ण क्षमतेने भरला तर साधणार मार्च- एप्रिलपर्यंत शेतीला पाणी पुरते. त्यामुळे आता पाऊस लांबल्याने नियमांच्या बाहेर जाऊन या बंधाऱ्यांची दारे टाकण्याची गरज आहे. पोटेगाव बंधारा फक्त नावाला आहे. त्याची दुरुस्ती होणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार या बंधाऱ्यासाठी आमदार संजयमामा शिंदे यांनी पाठपुरावा करून ४ कोटी मंजूर केले.

## नितीन गडकरी यांचा गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते सन्मान

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क


**पंढरपूर** : श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी महामार्गाच्या सहाव्या टप्प्याच्या चौपदरीकरण कामाचा भूमीपूजन समारंभ नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री भारत सरकार यांच्या हस्ते कर्वे नगर, पुणे येथे संपन्न झाला. या कार्यक्रमात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर च्या वतीने सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते वारकरी पगडी, विना, चिपळ्या, श्रींची मूर्ती व शेला देऊन सन्मान करण्यात



आला. याप्रसंगी मंदिर समितीच्या सदस्या ॲड. माधवी निगडे व कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके उपस्थित होते. "पंढरीची वारी" हा वारकरी संप्रदायाबरोबरच अवघ्या महाराष्ट्राच्या अध्यात्मिक, सांस्कृतिक व सामाजिक जीवनाचे अधिष्ठान असलेला विषय आहे. पंढरीच्या वारीला शेकडो वर्षांची अध्यात्मिक परंपरा आहे. ज्या मार्गाने शेकडो वर्षांपूर्वी "संतांची पाऊले" चालली व आताच्या काळात प्रतिवर्षी लाखो भाविक-भक्त-वारकरी चालतात त्या मार्गाचे सुशोभीकरण व सोयी- सुविधांमुळे सुखकर झालेली वारी ही » पान ३ वर

## शेतकऱ्यांना दीड लाख रुपयापर्यंत कर्जमाफी देण्यासाठी शासनाच्या हालचाली

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर** : आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून महायुती शासनाने महिलांची मते मिळविण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेस चांगला प्रतिसाद मिळाला असल्याचे दिसून आले आहे. आता शेतकऱ्यांच्या मताकडे लक्ष ठेवून शासनाने शेतकऱ्यांना दीड लाख रुपयापर्यंत कर्जमाफी देण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. यामुळे शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त होत आहे. शेतकरी बँका, पतसंस्था, खाजगी सावकार पहिले यांच्याकडून पैसे घेऊन शेतात पिकांची लागवड करतात. मात्र नैसर्गिक आपत्तीमुळे शेतातील पिकांचे नुकसान झाल्यास शेतकरी आर्थिक संकटात सापडतो. मात्र बँका, पतसंस्था, खाजगी सावकार कर्ज वसुलीचा तगादा लावतात. यामुळे शेतकरी टोकाचे पाऊल उचलतो. राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढले असल्याने शेतकऱ्यांची आर्थिक » पान ३ वर

## पंतप्रधानाचे शेतकऱ्यांकडे लक्ष; केंद्रीय कृषिमंत्री दर मंगळवारी शेतकऱ्यांशी संवाद साधणार

**पंढरपूर** : देशातील शेतकऱ्यांच्या मालाला चांगला दर मिळावा शेतकऱ्याचे आर्थिक उत्पन्न वाढावे यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लक्ष केंद्रित केले आहे. शेतकऱ्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी आता दर मंगळवारी केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत.

शेतकरी शेतात पिकांची लागवड करतो. मात्र नैसर्गिक आपत्तीमुळे शेतातील पिकांचे नुकसान होत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडत आहे. हे पाहून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांना पीएम किसान विमा योजना जाहीर केली आहे. या अंतर्गत शेतकऱ्यांनी एक रुपया भरून पिकांचा विमा उतरवल्यानंतर पिकांचे नुकसान झाल्यास विमा कंपनीकडून नुकसान भरपाई मिळणार आहे. तसेच गोरगरीब शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी पीएम किसान योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना वर्षाला ६ हजार रुपये देण्यात येत आहेत. देशात खते-बियाणे, कीटकनाशक यांच्या किंमती वाढू नये. यासाठी केंद्र सरकारने लक्ष केंद्रित केले आहे. शेतकऱ्यांच्या मालाला चांगला दर मिळावा म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी किसान रेल्वे सुरू केली असून एका राज्यातील माल दुसऱ्या राज्यात विक्री होत असल्याने शेतकऱ्यांना



चांगला फायदा होत आहे. आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधण्याची जबाबदारी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज्यसिंह चौहान यांच्यावर सोपवली असून शिवराज्यसिंह हे दर मंगळवारी देशातील शेतकऱ्यांच्या अडीअडचणी सोडवणार आहेत. यामुळे शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त होत आहे. आगामी रब्बी हंगामासाठी केंद्र सरकारने २४ हजार ४७५ कोटी रुपये मंजूर केले आहेत. रब्बी हंगामात खते, बियाणे, कीटकनाशके यांचा तुटवडा भासू नये याकडे केंद्र सरकारने लक्ष केंद्रित केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारावी यासाठी प्रयत्न करत असल्यामुळे शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त होत आहे.

## धनगर समाज आक्रमक; सोमवारी राज्यभर करणार रस्ता रोको आंदोलन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर** : धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावे. या मागणीसाठी पंढरपुरात धनगर समाजातील नेत्यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. आरक्षणाबाबत शासनाने कोणताही निर्णय घेतला नसल्याने धनगर समाजाने आता सोमवारी 23 सप्टेंबर रोजी राज्यभर रास्ता रोको आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळावे अशी मागणी गेल्या ५० वर्षापासून करण्यात येत आहे. मात्र याकडे शासन दुर्लक्ष करत आहे. म्हणून आगामी विधानसभा निवडणूकच्या अगोदर धनगर समाजाला आरक्षण मिळण्यासाठी पंढरपुरात धनगर समाजातील नेत्यांनी अमरण उपोषण सुरू केले आहे. यातून तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आठ दिवसापूर्वी मुंबई येथे धनगर समाजातील नेत्यांबरोबर बैठक घेतली. या बैठकीत आरक्षण देण्याबाबत एक समिती नियुक्त करण्यात आली आहे. याचा अहवाल आल्यानंतर पुढील निर्णय घेण्यात येणार आहे. मात्र आंदोलन समाप्त करावे असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. परंतु उपोषणास बसलेल्या नेत्यांनी अगोदर आमच्या हातात आरक्षणाचा जीआर दिल्यानंतरच उपोषण मागे घेण्यात येईल अशी मागणी केली आहे. त्यांनी आमरण उपोषण सुरूच ठेवले आहे. उपोषण सुरू ठेवून बारा दिवस झाले. उपोषणकर्त्यांची तब्येत खालावत आहे. यामुळे धनगर समाज आक्रमक झाला असून त्यांनी शुक्रवारी पंढरपुरात राज्यस्तरीय बैठक घेतली. या बैठकीत पहिल्यांदा राज्यातील खासदार, आमदार यांच्या घरासमोर आंदोलन. यानंतर २३ सप्टेंबर रोजी राज्यभर रास्ता रोको आंदोलन व २४ सप्टेंबर रोजी पुन्हा पंढरपुरात राज्यस्तरीय बैठक घेऊन या आंदोलनाची अंतिम दिशा ठरविण्याचा निर्णय घेतला आहे . यामुळे धनगर समाजातील नेत्यांनी आंदोलनाची तयारी सुरू केली आहे. आरक्षण मिळावे या मागणीसाठी धनगर समाज आक्रमक झाला असल्याचे दिसून येत आहे. आता २४ सप्टेंबर रोजी पंढरपुरात होणाऱ्या राज्यस्तरीय बैठकीकडे धनगर समाजातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.




**सांगोला :** सांगोला शहरातील विविध 14 विकास कामांसाठी तब्बल 20 कोटींचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती तालुक्याचे आमदार शहाजी पाटील यांनी दिली. सांगोला शहरातील लोणार, मातंग, रामोशी, चर्मकार, हटकर, शिंपी, महर्षी वाल्मिकी कोळी, नाभिक समाजासाठी समाज मंदिर बांधणे व सभागृह बांधणे, व्यापारी संकुल बांधणे, मुलांसाठी खेळाचे मैदान विकसित करणे अशा 14 कामांसाठी मुख्यमंत्र्यांकडून खास बाब म्हणून सुमारे 20 कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याची माहिती पाटील यांनी दिली.

### श्रीराम शिक्षण संस्था संचालित कॉलेज ऑफ फार्मसी, पानीवचे प्राचार्य

# डॉ. स्वप्नील अशोक फडे यांना सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार प्रदान

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस :** श्रीराम शिक्षण संस्था संचालित कॉलेज ऑफ फार्मसी, पानीवचे प्राचार्य डॉ. स्वप्नील अशोक फडे यांना फॅबटेक एज्युकेशन सोसायटीच्या फार्मसी कॉलेजने वर्ष २०२४ या सालासाठी देण्यात येणारा सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला आहे. डॉ. फडे यांचा शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्रातील योगदान वाखाणण्याजोगे असून, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी ते सतत पुढाकार घेत आले आहेत.

डॉ. फडे यांना फार्मसी क्षेत्रात १९ वर्षांचा अनुभव आहे. त्यापैकी ३ वर्षे त्यांनी सिप्ला फार्मा, गोवा येथे काम केले, आणि मागील १६ वर्षांपासून ते श्रीराम शिक्षण संस्थेच्या कॉलेज ऑफ फार्मसी, पानिव येथे प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. डॉ. फडे यांचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये २१ संशोधन आणि समीक्षा पेपर प्रकाशित झालेले आहेत. त्यांनी ४ उत्पादन पेटंट दाखल केली असून, ३ डिझाइन पेटंट मंजूर झाली आहेत. त्यांनी फार्मसी मधील विविध विषयातील ५ पुस्तके प्रकाशित केली आहेत, तसेच MSBTE व DBATU विद्यापीठाच्या विविध समित्यांमध्ये सदस्य म्हणून कार्य केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ०६ एम. फार्मसी व ३४ बी. फार्मसी विद्यार्थ्यांनी यशस्वीरित्या प्रोजेक्ट पूर्ण केले आहेत. संस्थेचे अध्यक्ष मा. प्रकाश पाटील यांनी या यशाबद्दल अभिमान व्यक्त करताना सांगितले की, "फडे सरांचे मार्गदर्शन अनेक विद्यार्थ्यांना फार्मसी क्षेत्रात यशस्वी बनविणारे ठरले आहे. त्यांचे सतत आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शन हे केवळ विद्यार्थ्यांसाठीच नव्हे, तर संपूर्ण कॉलेजच्या नावाला राज्यभर प्रसिद्धी व प्रतिष्ठा मिळवून देणारे आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. त्यातलेच एक नाव म्हणजे प्राध्यापिका दीपाली माने, ज्यांनी सांगितले की, "फडे सरांच्या मार्गदर्शनामुळे मी माझे एम. फार्म (फार्माकॉलॉजी) पूर्ण केले आणि आज मी सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. सरांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचे भाग्य मला लाभले आहे." तसेच, माजी विद्यार्थी अजिंक्य मोहिते, यश दुधाट, मयुर भाणवसे यांनी सांगितले की, "फडे सरांनी आम्हाला फक्त शैक्षणिकच नव्हे, तर सर्वांगीण विकासासाठीही मार्गदर्शन केले आणि त्यामुळेच आम्ही शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करू शकलो." डॉ. फडे यांनी पुरस्कारासाठी सर्व सहकाऱ्यांचे आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले असुन, पुढील काळात शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी सतत प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन दिले आहे

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. प्रकाश पाटील, मार्गदर्शिका मा. सौ. श्रीलेखा पाटील, उपाध्यक्ष मा. करण पाटील, सचिव मा. अभिषेक पाटील, सीईओ मा. दिनेश शिंदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी डॉ. फडे यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले व भविष्यातील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## माढा मतदारसंघावर मोहिते पाटलांचा डोळा



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** 2024 च्या लोकसभा निवडणुकीत राज्यात भाजपला जसा जोर का झटका बसला, तसाच झटका माढा लोकसभा मतदारसंघात देखील बसलाय. त्यामुळं गेल्या काही दिवसात मोहिते पाटलांची कमी झालेली राजकीय ताकद पुन्हा वाढली. ज्या मतदारसंघात शिंदे बंधू यांची ताकद होती, त्या मतदारसंघात मोहिते पाटलांनी मताधिक्क्य मिळवलं. त्यामुळं येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मोहिते पाटलांकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. माढा मतदारसंघावर मोहिते पाटलांचा देखील डोळा आहे. तुतारीकडून शिवतेजसिंह मोहिते पाटील हे या मतदारसंघातून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक आहे.

» Selected

## विरोधकांनी नरेटीव्ह सेट केल्याने लोकसभेत पराभव



**सोलापूर :** विरोधकांनी लोकसभा निवडणुकीत नरेटीव्ह सेट केल्याने लोकसभेत पराभव झाला. कार्यकर्त्यांनी तळागाळातील लोकांपर्यंत पोचण्यासाठी काम करावे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भाजपचे संघटन वाढविण्यासाठी जोमाने तयारीला लागावे, असे आवाहन माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी केले. सोलापूर जिल्हा पश्चिम भागातील भाजप पदाधिकाऱ्यांची येथे बैठक आयोजित केली होती. या बैठकीला माजी खासदार निंबाळकर बोलत होते.

## राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्याची औषध पिऊन आत्महत्या




**मोहोळ :** मोहोळ तालुक्यातील विरवडे बु. येथील राज नानासाहेब आवताडे (२७) या तरुणाने अज्ञात कारणावरून शुक्रवारी दुपारी राहत्या घरात विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली. राज अवताडे हे छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष आणि राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुका सरचिटणीस म्हणून तालुक्यात सक्रिय होते. राज यांनी दुपारी गावाजवळ असलेल्या शेतात अज्ञात कारणावरून विषारी औषध प्राशन केले. त्यांना तत्काळ सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, त्यापूर्वीच राज हे मृत झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. राज आवताडे यांनी कोणत्या कारणावरुन आत्महत्या केली हे मात्र समजू शकले नाही. राज आवताडे हे एक पदाधिकारी म्हणून मोहोळ तालुक्यात पक्षाच्या कामात सक्रिय होते.

## मोहोळ तालुक्यात मळणी यंत्रात साडीचा पदर अडकून जखमी झालेली महिला ठार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** शेतात मुगाची रास करत असताना ४२ वर्षीय महिला शेतमजुराची साडी मळणी मशीन यंत्रामध्ये अडकली.



त्यामुळे पाय अडकुन त्या जोराने डोक्यावर आपटल्या गेल्याने डोकीस मार लागुन त्यांचा मृत्यू झाल्याची घटना मोहोळ तालुक्यातील शिरापूर सो. येथे दि. २० सप्टेंबर रोजी सायं. ५ वाजण्याच्या दरम्यान घडली. भामाबाई महादेव कोळेकर असे मृत महिलेचे नाव आहे.

याबाबत मोहोळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महादेव कोळेकर हे पत्नी भामाबाई,मुलगा व सून असे मोहोळ तालुक्यातील शिरापूर सो. येथे राहत असून मोलमजुरी करून कुटुंबाची उपजीविका करतात. दि. २० रोजी मोरवंची येथीलच रामा कोळेकर यांच्या शेतामध्ये मुगाची रास करण्यासाठी मजुरीने भामाबाई कोळेकर या इतर महिलांसह गेल्या होत्या.

दरम्यान ५ वाजण्याच्या सुमारास भामाबाई कोळेकर या मुगाची गद्दे उचलुन मशीन मध्ये टाकत असताना, मळणी मशीन फिरवणाऱ्या ट्रॅक्टरच्या जॉईन्टमध्ये व मळणी मशीनच्या यंत्रामध्ये साडी अडकली व त्यामुळे पाय अडकुन त्या जोराने डोक्यावर आपटल्या. त्या त्यांच्या डोकीस मार लागुन रक्तस्राव सुरू झाला.त्यावेळी त्यांना इतर महिला शेतमजूरांच्या मदतीने मोहोळ ग्रामीण रूग्णालयात दाखल केले असता तेथे डॉक्टरांनी तपासून उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे सांगितले. याप्रकरणी चंद्रकांत ज्ञानदेव कोळेकर यांनी मोहोळ पोलीस ठाण्यात खबर दिली असून अधिक तपास मोहोळ पोलीस करीत आहेत.

## पर्युषण पर्व

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**कुर्डूवाडी :** येथील अनंतनाथ दिगंबर जैन मंदिरात पर्युषण पर्वा निम्मित विविध कार्यक्रम घेण्यात आले. नवजीवन हॉस्पिटल पासून अनंतनाथ दिंगबर जैन मंदिरा पर्यंत पालखी मिरवणूक या प्रसंगी काढण्यात आली होती. याप्रसंगी रिया राहुल शहा, सिद्धाली सागर शहा, नव्य मंदार शहा, वृषाली गांधी, सारिका तांबोळी, सारिका दोशी, स्वरूपा दोशी , अध्यक्षा ज्योत्सना शहा आदी समाज बांधव उपस्थित होते.

# द्वेष, अहंकार, पैशाच्या मस्तीत गुरफटली निवडणूक !

**दिडशे वर्षे इंग्रजाच्या सत्तेच्या टाचेखाली रगडली गेलेली भारतीय जनता स्वातंत्र्य मिळविण्याच्या महत्वकांक्षेने रणांगणात उतरली. तत्कालीन ध्येयनिष्ठ, प्रामाणिक, जनतेशी इमानदार आणि या सर्वपेक्षा महत्वाचे म्हणजे राष्ट्रभक्तीची ज्योत सातत्याने अंतःकरणात पेविलेल्या सर्व नेत्यांनी या जुलमी सत्तेला हैराण करुन सोडले आणि १५ ऑगस्ट १९४७ रोजी दिल्लीच्या लाल किल्ल्यावर तिरंगा फडकविला गेला. ही आमच्या स्वतंत्र भारताची उर्मी प्रजासत्ताक नावाच्या संविधानाने प्रज्वलित झाली आणि बुद्धीच्या वैभवाचे लोकनेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाने भारतीय घटना तयार झाली आणि खऱ्या लोकशाहीची नांदणी भारतात विराजमान झाली.**






लोकशाहीत लोकांनी निर्माण केलेले, लोकांसाठी निर्माण झालेले आणि लोकांनी चालविलेले लोकशाही राज्य परंपरा सुरुवात झाली. आज ७५ वर्षाचा कालावधी म्हणजेच अर्मृत महोत्सवी कालखंडात आमचा हिंदुस्थान पदार्पण करीत असतानाच १८ व्या लोकसभेची निवडणुक नुकतीच पार पडली. या निवडणुकीत काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आरोप-प्रत्यारोपाचा गहजब उडाला. अनीतीतून आणि नैतीकतेतून मिळविलेल्या पैशाची अक्षरशः संपूर्ण देशभर चाळण करण्यात आली. आरोप-प्रत्यारोपाचे दाट धुके पसरुन गेले. आघाड्या, पंथ, पक्ष यांनी अक्षरशः थैमान घातले. किंबहुना भावी काळातल्या आपल्या कल्पना जनतेसमोर ठेवल्या तर सतताधारी पक्षांनी केलेल्या कार्याचे ढोल वाजविले आणि भविष्यकाळात भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर आर्थिकदृष्ट्या आणण्याचे आश्वासन दिले. अनेक राज्यात लोकसभेच्या निवडणूकीच्या निमित्ताने अनेक योजना जनतेच्या पुढ्यात ठेवल्या. १०० दिवस होवून गेले. राज्यकर्ते सत्तेवर बसले. पण पहिला जोर (समर्थनाचा) कमी झाला. पण सत्ता काबीज केली. आणि विधानसभेच्या निवडणूकीचा बिगुल वाजला. नंदनवनात निवडणूका पार पडल्या. कांही ठिकाणच्या तारखा जाहीर झाल्या. काही राज्याच्या तारखा उंबरठ्यावर उभ्या आहेत. या राज्यातल्या विविध पक्षांनी जनतेपुढे आश्वासनांचे ढीग उभे केले. तर कांही राज्यात लाडक्या बहिणीची माया आली, कांही ठिकाणी भावांना मदत झाली. वृद्धांना पिडणाऱ्या रोगांना साथ देणाऱ्या अनेक योजना साधनाने कार्यान्वित केल्या. कुणी चष्मा घ्या, कुणी वॉकर घ्या, अनैसर्गिक पाय बसवा, कुणी कमोड खुर्ची घ्या, पण उतरत्या वयाला आधार द्या. कृषीजनांना अनेक सवलती दिल्या गेल्या. व्यापाऱ्यांना आधार दिला. बेकार हातांना काम देण्याच्या योजना आणल्या. दलितांना आर्थिक बळ दिले, आणि विश्वकर्मा कौशल्यांने कारागिरांना सन्मानित करण्यात आले. समाजासमोर मताची पेटी भरण्यासाठी जे जे करता येणे शक्य आहे ते करायला सुरुवात झाली आहे आणि विरोधी पक्षांकडून आश्वासनांची खैरात करण्यात आली. ही महाराष्ट्रासह अन्य राज्यातल्या निवडणुकीची चाहूल आहे. येत्या पंधरा दिवसात निवडणुकीसाठी आधिसूचना जाहीर होईल आणि संपूर्ण राज्यात निवडणूक संहिता बंधनकारक ठरविली जाईल. हे सध्याच्या निवडणूकीचे वास्तव आहे.

महाराष्ट्राचा विचार केला तर सत्तेत असलेल्या भाजपा शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गट यांच्यात उमेदवार निवडीची ढाल-तलवारी घेऊन लोकांना न दिसणारी अंतर्गत टोळी युद्ध सुरु आहे. कुणाला किती जागा, कुणाच्या खेचायच्या, कुणाला हाकलायचं आणि कुणावर अन्याय करायचा या गणिताची रुपरेषा सत्ताधाऱ्यात सध्या सुरु आहे तर विरोधी पक्षात बेरीज-वजाबाकी सुरु आहे. कुणाचं जनमत कसं आहे, कोण किती थैल्या सोडू शकतो आणि जनमाणसात त्याची प्रतिमा काय आहे याचं विचारमंथन चालू आहे. सगळ्यात महत्वाचं म्हणजे भाजपमध्ये शिस्तबद्ध गुप्तपणे मतदारांशी संधान साधणारी प्रचार यंत्रणा कार्यान्वित करण्याची अहनामिका लागलेली आहे. रेशीम बागेच्या आशिर्वादाखाली असलेल्या सगळ्या संस्था आणि उपसंस्था भाजपनी कामाला लावलेल्या आहेत. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेपासून ते ग्राहक मंचापर्यंतच्या सर्व यंत्रणा भाजपने कामाला लावलेल्या दिसतात. ज्या संघटनांचे प्रमुख आहेत त्यांच्याकडे सध्या जातवार, समाजवार मतदारांची फायनल लिस्ट तयार आहे. संभाव्य उमेदवारांनी त्या नियंत्रण कक्षातील कार्यकर्त्याला भेटायचे, त्याने संग्रहीत केलेली माहिती घ्यायची आणि मार्गदर्शन केल्याप्रमाणे मतदारांच्या चुलीपर्यंत पोहोचायचे. उमेदवाराने किंवा त्यांच्या जवळच्या बगलबच्च्याने चुलीपर्यंत पोहोचायचे. कुटुंब प्रमुखांना विचारायचे आणि त्याचक्षणी अपेक्षाप्रमाणे त्याची पूर्ती करायची आणि मतदान क्रमांकावर गोळ आळे करुन बाहेर पडायचे. या गोळ्याचा परिणाम दै.पंढरी संचारनेही भोगला आहे. गोळे करणारांनी खिसे भरले आणि दारुचे ग्लास रिकामे केले. हा विनोद नाही हे वास्तव आहे. अशा पद्धतीने निवडणूकीची कार्यप्रणाली पक्षीय पातळीवर कार्यरत असताना दिसते. या सगळ्यापेक्षा चालू येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत प्रत्येक वार्डात, प्रत्येक मतदार संघात इतकेच नव्हेतर प्रत्येकाच्या घरात जातीय वादाचं विष पेरलं गेलेले आहे. कोणता मराठा, कोणता ब्राह्मण, कोणता ओबीसी, कोणता मागासवर्गीय, कोणता दलित, कोणता आदिवासी, कोणता जंगम, कोणता मुस्लिम, कोणता ख्रिश्चन आणि हे सगळे या मातीचे वारसदार आहेत. या सगळ्या जाती-जमाती आमच्या हिंदुस्थानच्या एकनिष्ठेशी प्रतिज्ञाबद्ध आहेत. निष्ठा कधी जातीवर अवलंबून नसते. निष्ठा रक्तात असावी लागते. जी निष्ठा महात्मा गांधींच्या रक्तात होती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रक्तात होती. जी भावना अटलबिहारी वाजपेयी यांच्या रक्तात होती. जी भावना पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या रक्तात होती. तीच भावना आमची राष्ट्रनिष्ठा होती. जाती-पातीच्या बाहेर जाऊन सामाजिक ऐक्याची नांदी जोपासणारी भावना ज्यावेळेस होती ती भावना मात्र या निवडणूकीच्या आधी महिना-दोन महिने चाललेल्या जाती-पातीच्या रणांगणावरुन स्पष्टपणे दिसून येते. ज्याला मातीची किंमत आहे. त्यांना वडिलांची किंमत आहे. त्यालाच राष्ट्रनिष्ठेची किंमत ठेवावी लागते हे आमच्या भारतीय संस्कृतीचे ब्रीदवाक्य आहे. हे आम्ही विसरुन चाललेलो आहोत.

मतदारसुद्धा एकनिष्ठ असणे गरजेचे आहे. अनैतिकतेने मिळविलेल्या पैशाची उधळण करुन मतदारांच्या गरजा भागविणारी नादान औलाद राष्ट्रनिष्ठेचे प्रतिक कधीच बनू शकत नाही. हे वास्तव आहे. आणि येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत हाच तमाशा आणि गोंधळ मोठ्या प्रमाणात होताना दिसतोय. अहंकारांनी माजलेले, सत्तेनी फुगलेले, खुर्चीची हाव असलेले नादान लोकप्रतिनिधी राष्ट्राचे, राज्याचे, जिल्ह्याचे किंबहुना गावाचे अर्थात मतदार संघाचे वैभव कधीही वाढवू शकणार नाहीत. हे या निवडणूकीचा गर्भितार्थ जाणून घेणे महत्वाचे आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात काय वाढून ठेवले आहे. याचा अंदाज सुजाण मतदाराला आजतरी येत नाही. पण मतदारांनी राष्ट्रनिष्ठेची शपथ घेऊन पुढे आलेल्या स्वार्थाला झुगारुन योग्य पक्ष आणि योग्य उमेदवार यांना आपली पसंती दिली तर खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे कल्याण चिंतणारी सत्ता खुर्चीवर स्थानापन्न होऊ शकते. याचा विचार प्रत्येक मतदारांनी करणे गरजेचे आहे. माझ्या मतदानावर राष्ट्राच्या निष्ठेचा अंकुर निर्माण झाला आहे. याचा स्वाभिमान बाळगला तरच या निवडणुका चारित्र्य संपन्न उमेदवाराचा स्थायीभाव प्रस्थापित करणारा ठरतील. केवळ सत्ता हातात घेऊन जाती-पातीचं राजकारण करण्यासाठी सत्तेची मजा मौज घेण्यासाठी उमेदवारी नसते तर सामाजिक समभाव जागृत ठेवून आपल्या जनतेच्या स्थैर्याच्या, सर्वांगिण विकासाचा पाया मजबूत करुन जनतेत सौख्य प्रस्थापित करण्याची भूमिका घेणे म्हणजे उमेदवारी स्वीकारल्याची फलनिष्पती मानावी लागते. यापेक्षा अधिक सांगणे न लगे !



निवडणूक

बाळासाहेब बडवे
मो.नं. 7028543453

**सोलापूर ः** ग्लोबल पुरस्कार प्राप्त डिसले गुरूजी यांच्या अडचणी पुन्हा एकदा वाढण्याची चिन्हे आहेत. त्यांच्या पत्नीचा कौटुंबिक हिंसाचार केल्याप्रकरणी न्यायालयात शनिवारी (ता. २१) उपस्थितीत रहावे अशी नोटीस येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांनी (तिसरे) रणजितसिंह डिसले यांच्यासह चौघांना काढली आहे. बार्शी तालुक्यातील मुळचे असलेले रणजितसिंह डिसले गुरुजी हे सोलापूर जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत.

## 'स्वेरी' हे पंढरपूर तालुक्यातील एकमेव कौशल्य विकास केंद्र


# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले 'आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रा'चे ऑनलाइन उद्घाटन

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर ः** 'कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग यांच्या 'आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रा' च्या अनुषंगाने आज वर्ध्यात भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी विविध विकास कार्याचे उदघाटन केले. या कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपणाचा आनंद स्वेरीतील विद्यार्थ्यांनी घेतला. मा. पंतप्रधान मोदी यांनी शिक्षण विषयक नवीन योजना, समृद्धीपूरक उपक्रम व धोरणासंबंधी विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.
स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन. डी.मिसाळ आणि पदवी अभियांत्रिकीच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली स्वेरीच्या अभियांत्रिकी (पदवी व पदविका) महाविद्यालयात या थेट प्रक्षेपण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे हे देखील उपस्थित होते. व्हर्च्युअल कॉन्फरन्स (दुरदृष्य प्रणाली) द्वारे या कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपणाचे आयोजन केले होते. स्वेरी डिप्लोमाच्या इंटरनॅशनल कॉन्फरन्स हॉलमध्ये, तसेच इंजिनिअरिंगच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट हॉलमध्ये या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण पाहण्याची सोय करण्यात आली होती. या योजनेत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील व्यवसायिक शिक्षणाचे महत्त्व ओळखून कौशल्य विकास या संकल्पनेचा अधिकाधिक फायदा राज्यातील युवक युवतींना व्हावा, राज्यामधील १०३० नामांकित महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र स्थापन करून महाविद्यालयीन युवक-युवतींना रोजगारक्षम बनविण्याच्या मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता यांचा मानस आहे. त्यापैकी पंढरपूर तालुक्यामधून फक्त स्वेरी महाविद्यालयाची निवड केली आहे. या योजनेद्वारे स्वेरीच्या डिप्लोमा इंजिनिअरिंगमध्ये सिव्हील सर्वेअर आणि ड्रॉप्समन मेकॅनिकल या दोन ट्रेनिंग प्रोग्रामला मान्यता मिळाली आहे. तर डिग्री इंजिनिअरिंगमध्ये सर्वेअर आणि सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग प्रोडक्ट डेव्हलपमेंट या दोन ट्रेनिंग प्रोग्रामला मान्यता मिळाली आहे. या चारही अभ्यासक्रमांसाठी प्रवेश क्षमता प्रत्येकी ३० विद्यार्थी एवढी आहे. सदरील विद्यार्थ्यांना हे प्रशिक्षण मोफत स्वरुपात मिळणार आहे. या महत्वाच्या ट्रेनिंग प्रोग्रामामुळे स्वेरीमध्ये नव्या अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ज्ञानात नक्कीच भर पडणार आहे. या थेट प्रक्षेपणाचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डिप्लोमा इंजिनिअरिंगमध्ये प्रा. व्ही. एस. स्वामी, प्रा. अमेय भातलवंडे, डिग्री इंजिनिअरिंगमधील प्रा. ए.ए.मोटे, प्रा. एस.ए. इनामदार, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## आजाराला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** बाळासाहेब प्रल्हाद मस्के (वय ७१) यांनी आजाराला कंटाळून स्वतःच्या शेतात जाऊन लिंबाच्या झाडास दोरीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शुक्रवारी दुपारी एकच्या सुमारास घडली. याबाबत तुळशिदास मस्के (वय ४३) यांना ही घटना समजताच त्या शहर पोलिसांत चुलत्यांनी गळफास घेतल्याची खबर देताच पोलिसांनी जाऊन पंचनामा केला. शविच्छेदनास ग्रामीण रुग्णालयात पाठविले. शहरानजीक फपालवाडी रोडवर रेल्वे गेटजवळ असलेल्या स्वतःच्या शेतात लिंबाच्या झाडाला दोरीच्या साहायाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे सांगण्यात आले.

» पान १ वरुन

## नितीन गडकरी यांचा गहिनीनाथ ...

आपले अथक प्रयत्न, नियोजन व मार्गदर्शनाने संतांच्या पालखीमार्गाच्या विस्तृतीकरणाने वैष्णवांच्या या मांदियाळीची मोठी सेवा आपण शासनाला घडविलीत, याबद्दल गडकरीं यांचे कृतज्ञता पत्र देऊन सहस्रशः अभिनंदन करण्यात आले.
या कार्यक्रमास केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री दिलीप वळसे पाटील, मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित होते. त्यांचा देखील मंदिर समितीच्या वतीने सन्मान करण्यात आला. तसेच मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर आणि आळंदी व देहू संस्थानांच्या प्रमुख विश्वस्तांचा देखील नितीन गडकरी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

## शेतकऱ्यांना दीड लाख रुपयापर्यंत...

परिस्थिती सुधारावी यासाठी केंद्र व राज्य शासन प्रयत्न करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांसाठी पीएम किसान योजना सुरू केली आहे. या अंतर्गत वर्षाला शेतकऱ्याला सहा हजार रुपये मिळत आहेत. तर आता नमो शेतकरी योजना राज्य शासनाने जाहीर केली आहे. या योजने अंतर्गत शेतकऱ्यांना वर्षाला सहा हजार रुपये मिळणार आहेत. मात्र सध्या राज्यात विधानसभा निवडणुकीची मोर्चे बांधणी सुरू झाली आहे. लोकसभा निवडणुकीत महायुती शासनाला म्हणावे तसे यश मिळाले नाही. यामुळे महायुती शासनाने महिलांची मते मिळविण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेस राज्यात महिलांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे.यामुळे आता शेतकऱ्यांची मते मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना दीड लाख रुपयापर्यंत कर्जमाफी करण्याच्या हालचाली शासन स्तरावर सुरू झाल्या आहेत. यामुळे शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त होत आहे. आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून महायुती शासन राज्यातील नागरिकांना विविध योजना चा लाभ देत आहे.

## एक लाख उद्योजक तयार करण्याचे काम पूर्ण



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** श्री अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून एक लाख उद्योजक तयार करण्याचे काम पूर्ण झाले असून सोलापूर जिल्ह्यामध्ये १०१०६ लाभार्थ्यांना ८७० कोटीचे कर्ज वाटप केले आहे. या कर्जापोटी आज पर्यंत ८० कोटीचा व्याज परतावा देण्यात आला असल्याचे महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी आज सांगितले. लोकमंगल बँक व अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने सोलापुरातील हुतात्मा स्मृती मंदिर येथे मराठा उद्योजक मेळाव्याचे आयोजण करण्यात आले होते. यावेळी नरेंद्र पाटील बोलत होते.

## ईद-ए-मिलाद साजरा

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर ः** श्री कालिका देवी चौकामध्ये ईद-ए-मिलाद उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी सर्व मुस्लिम बांधवांना हिंदू बांधवांनी ईदच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी काढण्यात आलेल्या मिरवणूकीत सामील झालेल्या मुस्लिम चिमुकल्या व मुस्लिम बांधव.

## Selected

## भाजप कार्यकर्त्याच्या या स्टेटसने अनेकांना बसली चपराक



**सोलापूर ः** दक्षिण सोलापूर विधानसभा मतदार संघात विद्यमान आमदार सुभाष देशमुख यांच्याच पक्षातील माजी नगरसेवकांनी दुसऱ्याच इच्छुकाला पाठिंबा पत्र देण्याचा घाट घातला. एकीकडे आपल्या नेत्याची पाठ त्यांचेच कार्यकर्ते सोडत असताना दुसरीकडे मात्र एका कट्टर समर्थकाने "माझा नेता पावरफुल हॅट्रिक आमदार सुभाष बापू देशमुख"असे स्टेटस ठेवून अनेक कार्यकर्त्यांना चपराक लगावली आहे. देशमुख यांच्या सोबत उभा राहिलेला फोटो टाकत त्यांनी आपल्या स्टेटसला "माझा नेता पावरफुल हॅट्रिक आमदार सुभाष बापू देशमुख"असे म्हणून आपले जोरदार समर्थन दिले आहे.

## उमेदवारीसाठी शिफारस करणे अंगलट

**सोलापूर ः** दक्षिण सोलापूर मतदारसंघातून सोमनाथ वैद्य यांच्या उमेदवारीची शिफारस करणे भाजपचे सोलापूर शहर उपाध्यक्षांसह चार माजी नगरसेवकांच्या चांगलेच अंगलट आले आहे. भाजपच्या वतीने या चौघांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. आता या चौघांकडून काय उत्तर देण्यात येते, याकडे सोलापूरच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागून राहिले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इच्छुकांकडून राजकीय पक्षाची उमेदवारी मिळावी, यासाठी जोरदार मोर्चेबांधणी सुरू आहे.




## कुऱ्हाडीचे घाव घालून तरुणाचा खून

**मोहोळ ः** मोहोळ तालुक्यातील इंचगाव येथे कुऱ्हाडीचे घाव घालून ४५ वर्षीय तरूणाचा निर्घृण खून करण्यात आला. इंचगाव येथील बंदेनवाज दर्ग्याजवळ घडली. दत्तात्रय वामन वराडे असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव असून याप्रकरणी विजय नागनाथ घुले याच्यावर कामती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी नागनाथ वराडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विजय घुले याच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास कामती पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर उदार करत आहेत.




## राष्ट्रीय लोकअदालतीचे 28 सप्टेंबरला आयोजन



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर ः** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे निर्देशाप्रमाणे दि. 28 सप्टेंबर 2024 रोजी सोलापूर महानगरपालिकेच्या आवारात राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. सदर लोकन्यायालयामध्ये प्रामुख्याने सोलापूर महानगरपालिकेचे मिळकत कर तसेच भूमी व मालमत्ता विभागाची प्रकरणे ठेवण्यात आली आहे. नागरिकांच्या सोईसाठी मिळकत कर, भूमी व मालमत्ता विभागाशी संबंधीत प्रकरणासाठी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सदर सवलतीचा फायदा नागरीकांनी घ्यावा.

## फडणवीस यांच्याकडून सोलापुरातील विणकारांचे कौतुक



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर ः** राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्येक जिल्ह्यातील पद्मशाली समाजाच्या प्रमुख प्रतिनिधींची आज सागर बंगल्यावर महत्वाची बैठक बोलावली होती. यावेळी सोलापूरकरांच्या वतीने देवेंद्र कोठे, माजीमनपा आयुक्त चंद्रकांत गुडेवार, पद्मशाली समाजाची जेष्ठ मान्यवर एडवोकेट रामदास सब्बन आदींनी त्यांना सोलापुरातील यंत्रमागावर विणलेली चादर भेट म्हणून दिली. फडणवीस यांनी केलेले महाराष्ट्रातील ठळक कार्य विणकामातून प्रतिबिंबित केलेली चादर पाहून देवेंद्र फडणवीस यांनी सोलापुरातील विणकारांचे कौतुक केले.

## करमाळा पोलिसांविरोधात सोमवारपासून धरणे आंदोलन



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**करमाळा ः** करमाळा पोलीस प्रशासनाकडून सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष होत असल्याने सोमवार 23 सप्टेंबर पासून करमाळा पोलीस स्टेशनसमोर बेमुदत धरणे आंदोलन करणार असल्याचा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हाप्रमुख शाहू फरतडे यांनी दिला आहे. सर्वसामान्य नागरिकांना ठाणे अंमलदार, बीट हवालदार बेदखल करत आहेत. सर्वसामान्यांना कायद्याचा बडगा दाखवताना अनेकांची मात्र बडदास्त ठेवली जात आहे. त्या विरोधात हे आंदोलन करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

## 23 तारखेला राज्यभर रास्ता रोको!- आमदार गोपीचंद पडळकर



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर ः** धनगर समाजाला एसटीमधून आरक्षण मिळवण्यासाठी 23 तारखेला राज्यभर रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे, अशी माहिती भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी दिली. त्यांनी धनगर समाजाला एकत्र येण्याचे आवाहन केले, तसेच आदिवासी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लागण्याची खात्री दिली. 1980 पासून सुरू असलेल्या या आंदोलनात धनगर समाज नेहमीच आरक्षणासाठी संघर्ष करत आहे. पडळकर म्हणाले की, आदिवासी नेत्यांनी सरकारसोबत चर्चा केली पाहिजे आणि त्यांनीही पाणी कट करणे व रुळ उखडणे यासारख्या धमक्यांचा वापर करू नये.




## पंढरपुरातील काशीकापडी समाज तुळशीची माळ बनवणारे

# कारागीर म्हणून शासन दरबारी प्रथमच नोंद : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर ः** वर्धा येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय पी एम विश्वकर्मा 2024 या कार्यक्रमांमध्ये पंढरपूरच्या श्री विठ्ठलास प्रिय असलेली तुळशीच्या लाकडापासून तुळशीची माळ बनवणारे कारागीर हे काशीकपडे समाजाचे आहेत. काशीकापडी समाजाचा उदरनिर्वाह या व्यवसायावरच आहे.वारकरी सांप्रदायामध्ये तुळशीच्या माळेस अनन्यसाधारण महत्व असणाऱ्या तुळशीची माळ बनवणारा समाज म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात काशीकापडी समाज ओळखला जातो.
राज्यातील विविध भागात या समाजाचे वास्तव्य आहे. पिढ्यानपिढ्या वारकऱ्यांची सेवाभावी निस्सिम भावनेने करणारा हा समाज शासनाच्या विविध योजना पासून वंचित होता.परंतू विश्व कर्मा योजने मध्ये तुळशीच्या लाकडापासून तूळाशी माळा बनवनारा कारागिर म्हणून यांची शासन दरबारी प्रथम नोंद झाली यासाठी समाजातील सदस्य स्वप्निल टमटम, अनिल इंदापूरक,निरंजन पानकर,नितीन पानकर ,विशाल वाडेकर व समाजातील पदाधिकारी या सर्वांनि सहकार्य केले.या योजनेचा लाभ सर्व काशिकापडे समाजातील सर्व समाज बांधवांनी कारागिरांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन यावेळी करण्यात आले. पंढरपूर नगरपालिकेचे प्रशासकीय अधिकारी सुनील वाळूजकर व योगेश काळे यांचे विशेष सहकार्य लाभले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.



EDGE
pandharisanchar.com
पंढरी संचार



# पावित्र्य भंग

**३ लाख** — तिरुपती-तिरुमला देवस्थान दररोज सुमारे तीन लाख लाडू तयार करते.

**५०० कोटी** — तिरुपती-तिरुमला देवस्थानाला लाडू विक्रीतून मिळणारा महसूल



**६०० आचारी** · **४०० लिटर तूप** · **१७५ ग्रॅम लाडूचे वजन** · **७०० कि. काजू**

# तुम्ही मांसाहारी लाडू खाल्ला का ?

**मागील दीड वर्षे ज्यांनी ज्यांनी तिरुपती बालाजीचा प्रसाद ग्रहण केला आहे त्यांनी डुकराचे मांस युक्त चरबी आणि माशाचे तेल याचा अंतर्भाव असलेला हा प्रसाद खाल्ला आहे . धर्मक्षेत्रे देवस्थाने संप्रदाय यामध्ये भ्रष्टाचार देशाला नवा नाही परंतु जेव्हा ही धर्मस्थाने सरकारी व्यवस्थेकडे जातात तेव्हा त्यातून आस्था संपून जाते आणि संवेदनशील राजकारणी अधिकारी यांच्याकडून लोकांच्या श्रद्धेचा घात होतो हे अनेकदा दिसून आले आहे. पवित्र धर्मक्षेत्रे , मठ, मंदिरे सरकार नावाच्या भ्रष्ट व्यवस्थेपासून दूर ठेवावी, हे या देशातील धर्मासमोरचे मोठे आव्हान आहे**



विश्लेषण
अनिरुद्ध बडवे
(मुख्य संपादक)
पंढरी संचार

दोन दिवसांपूर्वी तिरुपती देवस्थानमधील लाडूमध्ये चरबी आणि माशाचे तेल वापरले जाण्याबाबतचा आरोप चंद्राबाबू नायडू यांनी केला. त्यानंतर मी दिल्ली येथील आमच्या एका कायदे तज्ञ असणाऱ्या एका वरिष्ठ संपादकाला फोन केला आणि खरोखरच यात किती तथ्यांश आहे हे विचारले ? चर्चेची सुरुवात करताना मी , तुम्ही तिरुपतीचा लाडू कधी खाल्ला का ? अशी केली. काश्मिरी ब्राह्मण असलेल्या या वरिष्ठ संपादकाने, अतिशय कापलेल्या आवाजात आणि वेदनादायक स्वरातून, माझे हाड बाटले गेले आहे याची मला आज जाणीव झाली, मै आज तक खुद को शुद्ध होने का फुकट का अहंकार लेके घूम रहा था | ... असे अक्षरशः सद्गतीत होऊन सांगितले. भाजपाचे वरिष्ठ मराठी परंतु दिल्लीमध्ये बऱ्यापैकी प्रस्थ असलेले नेते सुनील देवधर यांनी आपल्याला अनेकदा हा प्रसाद दिला आणि तो आम्ही आमच्या कम्युनिटीमध्ये वाटत अनेकदा खाल्ला असे त्यांनी सांगितले.

लॅब टेस्ट रिपोर्टमध्ये आलेला हा अहवाल तंतोतंत खरा असल्याचे त्यांनी सांगितले. आणि त्या लॅब टेस्टची कागदपत्रे देखील राष्ट्रसंचारसाठी उपलब्ध करून दिली .

या देशात घोटाळे नवीन नाहीत. कुठलेही क्षेत्र किंवा कुठलाही स्तर शिल्लक नाही की जेथे घोटाळा झाला नाही. घोटाळ्याची ही कीड धर्मस्थानांना तर केव्हाच लागली आहे. त्यामुळे देव धर्म सांप्रदाय हे देखील घोटाळ्यापासून आणि सांप्रदायापासून दूर नाहीत .

परंतु देशातील सर्वात मोठ्या देवस्थानामधील सर्वात मोठ्या महा पवित्र महाप्रसादाबाबत जेव्हा हा घोटाळा होतो आणि तो केवळ आर्थिक नव्हे तर कोट्यावधी हिंदूंच्या विश्वासाची आस्थेची शब्दशः कत्तल (!) करण्याचा भ्रष्ट - आचार जेथे होतो , तेव्हा मात्र त्या संपूर्ण व्यवस्थेबद्दल कमालीची चीड निर्माण होते.

## नेमका प्रकार काय?



चंद्राबाबू नायडू यांनी परवा एका कार्यक्रमात तिरुपती देवस्थानच्या प्रसादामध्ये फॅट म्हणजे डुकराची चरबी आणि माशाचे ऑइल वापरले जात असल्याचा आरोप केला. मागील सरकारच्या म्हणजे जगन मोहन रेड्डी यांच्या कार्यकाळात हा प्रकार झाला होता, याचे लॅब टेस्ट रिपोर्ट आमच्याकडे असल्याचे सांगितले. माध्यमांनी हे लॅब टेस्ट जेव्हा शोधले तेव्हा हे वास्तव असल्याचे समोर आले.

या प्रसादासाठी दररोज तीन लाख लाडू बनवले जातात त्यासाठी महिन्याला 90 हजार लिटर तूप लागते. एवढी मोठी डिमांड कुठलीही एक कंपनी पूर्ण करू शकत नाही म्हणून तीन वेगवेगळ्या कंपन्यांकडून हे तूप मागवले जाते.

त्यात आंध्र प्रदेश मधील एका नंदिनी नावाच्या कंपनीला दूर करून गुजरात मधील ए आर डेअरी या कंपनीकडून महिना 42 हजार किलो तूप मागवले जात होते याची किंमत प्रती किलो 320 रुपये होती. या तुपा मध्ये मांसाहारी घटक आढळल्याचे लॅब टेस्टमध्ये समोर आले.


जगमोहन रेड्डी यांच्या नेतृत्वाखालीच हा संपूर्ण व्यवस्थापन चालू असताना 2023 मध्ये या डेअरीशी करार करण्यात आला.

बाजारात शुद्ध तुपाची किंमत 500 ते 600 रुपये असताना ही कंपनी केवळ 320 रुपयाला एक किलो तूप देत होते कारण ते शुद्ध तूप नसून त्यामध्ये भेसळ युक्त घटक आणि जास्त काळ टिकण्यासाठीचे मांसाहारी घटक मिसळले जात होते.

सरकार बदलल्यानंतर आता चंद्राबाबू नायडू यांनी हे आरोप केले अर्थात ही त्यांची राजकीय लढाई असली तरी यामुळे कोट्यावधी हिंदू भाविकांच्या आस्थेला मोठा धक्का बसला या देशात 90 कोटी हिंदू लोक आहेत , आणि सर्वांची तिरुपती बालाजी वर नितांत श्रद्धा आहे. प्रत्येकाने कधी ना कधीतरी तिरुपती बालाजी चा प्रसाद खाल्ला आहे

## हिंदू व्यवस्था ख्रिश्चन मुखिया

ख्रिश्चन असणारे जगमोहन रेड्डी यांनी केवळ एक महा आर्थिक सत्ता धर्मकारणाच्या निमित्ताने आपल्याकडे येत आहे म्हणून त्यावरती नेतृत्व करणे आणि त्याच्या सगळ्या प्रथा परंपरा मोडकळीस काढत भ्रष्टाचाराला वाव देणे हे किती सहज सुलभ रित्या केले हेच यावरून दिसते.



या देशाचे धर्म स्थाने कवळ पैसा करिता किंवा आपल्या सामाजिक प्रतिष्ठे करिता सरकारी यंत्रणेला हवी आहेत. सरकारने प्रत्येक गोष्टीवरून ते नियंत्रण ठेवले आहे आणि एक प्रकारे अतिक्रमण देखील केले आहे . देशाच्या न्यायव्यवस्थेमध्ये देखील अतिक्रमण करण्याचे अनेक लहान मोठे अनुभव सर्वांनाच येत आहेत. धर्मस्थानामध्ये देखील हे अतिक्रमण मोठ्या प्रमाणामध्ये झाले आणि ते कोट्यावधी भाविकांसाठी अत्यंत वेदनादायी ठरत आहे.

जगन मोहन रेड्डी यांच्या आजोबांपासून त्यांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला, त्यामुळे त्या ख्रिश्चन व्यक्तीला हिंदू धर्मस्थान, त्याचा प्रसाद, त्याची पावित्र्यता याचे काहीही देणे घेणे नव्हते. त्यामुळे त्यांनी कधीही या व्यवस्थेचा चोख हिशोब ठेवला नाही, त्याकडे कधीही गांभीर्याने पाहिले नाही. केवळ राजकीय सामाजिक आणि आर्थिक सलोखा टिकवून राहण्यासाठी त्या त्या कंत्राटदारांना तुपाचे कंत्राटे दिले गेली आणि हा अर्थ व्यवहार सुरळीत राहावा इतकीच दक्षता घेतली गेली.

मंदिराच्या मुख्य पुजाराने तक्रार करून देखील हजारो भाविकांकडून प्रसादाची क्वालिटी खराब येते आहे काहीतरी बदल जाणवतोय अशा तक्रारी येऊन देखील कधीही त्या प्रसादाची लॅब टेस्ट करण्याचा विचार देखील टी टी डी ला आला नाही.

## मोठे अर्थकारण

1715 पासून तिरुपती मध्ये हा प्रसाद देण्याची प्रथा सुरू झाली 300 वर्षापासून ही प्रथा अत्यंत पवित्र मानले जाते. या देवस्थानाला वर्षभरात सुमारे 500 कोटी रुपये उत्पन्न हे या लाडूतून मिळते. दररोज तीन लाख लाडू बनवले जातात. 6 आचारी हे लाडू बनविण्याचे काम करतात. ज्या कंपनीकडून भेसळयुक्त मांसाहारी तूप घेण्यात आले त्यांना गेल्या तीन वर्षात 60 कोटी रुपये देण्यात आले आहेत जवळपास 65 हजार 700 किलोचे तूप त्यांच्याकडून घेण्यात आले आहे. हे तूप जास्त टिकावे शुद्ध लोण्याचा वापर कमी व्हावा यासाठी अतिरिक्त तेल प्रोटिन्स यामध्ये मिक्स करण्यात आले आणि त्यातून प्रोडक्शन कॉस्ट कमी करण्याचा प्रयत्न झाला. केवळ आर्थिक लालसा ही या एवढ्या मोठ्या धार्मिक विश्वासघाताच्या पाठीमागे होती. परंतु हे करत असताना या देशातील एक मोठा वर्ग शाकाहारी आहे किंवा प्रसाद, सण, व्रतवैकल्ये अशा घटकांमध्ये आणि अशा दिवसांमध्ये देखील व्यक्ती शाकाहारीच राहणे पसंत करतो हे देखील पाहिले गेले नाही.



लॅब टेस्ट मधील रिपोर्टनुसार ज्या घटकांची मात्रा 95 टक्के असली पाहिजे ती 20% होती आणि इतर घटक फॅटी ऑइल ( म्हणजे डुकराची चरबीचे पाणी आणि माशाचे ऑइल यांनी युक्त ) च्या माध्यमातून वापरले गेले होते हे स्पष्ट झाले आहे.

## कोणी खाल्ले मांसाहारी लाडू

सुमारे 2023 नंतर ते मार्च 2024 पर्यंत ए आर डेरी या कंपनीतून हे तूप पुरविले जात होते. जगमोहन रेड्डी यांच्या कार्यकाळातील हाच मोठा कालखंड हा या मांसहारयुक्त तुपाच्या पुरवठ्याचा होता. त्यामुळे जानेवारी 2023 पासून ते या वर्षाच्या मार्च 2023 पर्यंत म्हणजे जवळपास दीड वर्ष हा प्रसाद भेसळयुक्त होता हे स्पष्ट झाले आहे. या कार्यकाळात ज्या ज्या हिंदूंनी हा प्रसाद भक्षण केला , त्यांना आज अपवित्रतेची गंभीर जाणीव झाल्याशिवाय राहणार नाही.

## काय केले पाहिजे ?

हिंदुत्वादाची झालर घेऊन आलेल्या भाजपाच्या सरकारने आता तातडीने एआरडवर बंदी घातली पाहिजे . प्रत्येक देवस्थानामध्ये असलेला प्रसाद हा शुद्ध आणि पवित्र असला पाहिजे यासाठी अन्नदान होणाऱ्या किंवा प्रसाद वाटप होणारा प्रत्येक देवस्थानामध्ये लॅब टेस्टिंग हे सक्तीची केली पाहिजे.

आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे हळूहळू ही सर्व मंदिरे सरकारच्या व्यवस्थेपासून मुक्त केली पाहिजेत ते खरोखरच धार्मिक किंवा तेथिल वंशिक परंपरा जपणाऱ्या किंवा त्या देवस्थानाचे देवाचे धर्म सांप्रदायाचे भक्त असणाऱ्या भक्तमंडळींकडे दिली पाहिजेत सरकारी रुबाब प्रतिष्ठा पैसा यापासून ही धर्मक्षेत्रे मुक्त ठेवली पाहिजेत तरच येथे या सरकारी भ्रष्टाचाराचे पदर लागणार नाहीत.

## वाढणाऱ्या देवस्थानांना इशारा

एखाद्या देवस्थानाचा नावलौकिक वाढतो पसारा वाढतो मग तेथे सरकारी जमीन मागून त्याचा व्याप वाढविण्यात येतो हळूहळू तेथील अधिकारी लोकप्रतिनिधी त्यात लक्ष घालतात आणि तेथे कोट्यावधी रुपयाची उलाढाल होऊ लागली किंवा लाखो लोकांची गर्दी जमू लागली की राजकारणी लोक आणि पर्यायाने सरकार तेथे लक्ष घालते आणि हळूहळू त्याचा सरकारी करण्याचा प्रवास सुरू होतो.

या देशात आजही आशा अनेक ठिकाणे आहेत या खरोखरच पवित्र आहेत जागृत आहेत, त्याचे अनुभूती साधकांना आणि खऱ्या श्रद्धावान भक्ताला येते परंतु आपल्या या देवस्थानाचा लौकिक वाढला पाहिजे या भाबड्या आशेने त्याच प्रकारचे मार्केटिंग केले जाते, आणि अशाप्रकारे सरकारची म्हणजेच या भ्रष्ट व्यवस्थेची नजर यावर पडते. अशातूनच अनेक मंदिरांचे ट्रस्ट हे सरकारी करण्याकडे गेले मग तेथील धनसंपत्ती तेथील हजारो लोकांची व्यवस्था यासाठी खाजगी आणि स्थानिक मंडळे असक्षम आहेत सरकारने ही व्यवस्था हाती घेतली पाहिजे अशी मागणी होते आणि या भ्रष्ट व्यवस्थेचा येथे चंचू प्रवेश होतो.

म्हणून हिंदू समाजाने आपापली धर्मस्थाने मार्केटिंगच्या अंगाने वाढविण्यापेक्षा त्याची पवित्रता आणि जागृती अखंडित राहण्यासाठी आहेत त्याच स्वरूपामध्ये त्याची पूजाअर्चा करावी, त्याची पवित्रता राखावी.. हा एक नवीन विचार पुढे येत आहे.



# देदीप्यमान रत्न कर्मवीर भाऊराव पाटील

**महाराष्ट्र हा दगड धोंड्यांचा देश. अंजन कांचन कडे कपाऱ्यांचा देश. भले रत्नांची खाण या मातीत नसेलही, पण नवरात्नांची खाण मात्र या महाराष्ट्रात निश्चितच आहे. त्यापैकीच एक देदीप्यमान रत्न म्हणजे रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील. भव्य देहयष्टी, छातीपर्यंत रुळणारी पांढरी शुभ्र दाढी, प्रभावी व्यक्तिमत्व, पहाडी आवाज, अमोघ वक्तृत्व, असे एक ऋषीतुल्य व्यक्तिमत्व. आज रविवार २२ सप्टेंबर रोजी पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांची 137 व्या जयंतीनिमित्त विशेष लेख .**

प्रासंगिक
प्राचार्य दत्तात्रय जाधव
(साधना विद्यालय)
पंढरी संचार

१०० वर्षांपूर्वी ग्रामीण भागातील शिक्षणाची गरज ओळखणारे, ग्रामीण शिक्षण चळवळीचे जनक म्हणजेच कर्मवीर भाऊराव पाटील. संपूर्ण महाराष्ट्रभर अनवानी फिरून कर्मवीर भाऊरावांनी उभा महाराष्ट्र पिंजून काढला. गोरगरिबांच्या झोपडी पर्यंत शिक्षणाची गंगोत्री पोहोचवण्याचे कार्य केले. लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन आपल्या कार्यात सहभागी करून घेतले. लोकशाहीचा मूळ गाभा लोकशिक्षण आहे आणि लोकशिक्षण समाजाला विकासाकडे नेते, हे कर्मवीरांना ठाऊक होते. बहुजन, गोरगरिबांच्या मुलांमध्ये शिक्षण प्रसार करणारा देवमाणूस कर्मवीर भाऊराव पाटील एकीकडे आणि आताचे सगळे शिक्षण सम्राट एकीकडे. कर्मवीर ही उपाधी त्यांच्या कामातून लोकांनी त्यांना बहाल केली. एक वेळ जन्मदात्या पित्याचे नाव बदलीन पण कॉलेजला दिलेले शिवाजी महाराजांचं नाव बदलणार नाही, असे छातीठोकपणे सांगणारे कर्मवीर भाऊराव पाटील हे विरळाच. कोल्हापूर जिल्हा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या विचाराने भारावलेला आणि कार्याने प्रगतीपथावर गेलेला जिल्हा. याच जिल्ह्यातील कुंभोज गावी २२ सप्टेंबर १८८७ रोजी भाऊराव पायगोंडा पाटील यांचा जन्म झाला. भाऊराव पाटील यांचे वडील पायगोंडा पाटील कारकून होते. भाऊरावांचे प्राथमिक शिक्षण विटे, दहिवडी अशा वडिलांच्या बदलीच्या ठिकाणी झाले. १९०२ ते १९०७ यावर्षी कोल्हापूरच्या राजापूर हायस्कूलमध्ये ते शिकले. अभ्यासापेक्षाही ते कुस्ती, पोहणे, मल्लखांब या क्रीडा प्रकारात तरबेज होते. ते इंग्रजी सहावी पर्यंत शिकले होते. शाळेत फार शिकता जरी आले नाही तरी समाजाच्या शाळेत खऱ्या अर्थाने ते शिकले, माणसाचं आणि परिस्थितीचं त्यांनी वाचन केलं. तेव्हाचे इंग्रजी सहावी म्हणजे आत्ताचे दहावी शिक्षण असणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ज्ञानाची गंगा घरोघरी पोहोचवली. अनेक विद्यापीठांनाही लाजवेल अशा पदव्या आणि उपाध्या त्यांनी आपल्या कामातून मिळवल्या. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी भाऊरावांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. आज महाराष्ट्रातील १४ जिल्हे आणि कर्नाटकातील काही जिल्ह्यात रयत शिक्षण संस्थेचा वटवृक्ष पसरला आहे. आशिया खंडातील सर्वात मोठी शिक्षण संस्था म्हणून रयत शिक्षण संस्था ओळखली जाते. संस्थेला स्वायत्त विद्यापीठाचा दर्जा मिळालेला आहे.

स्वतःची शेती असणारा शेतकरी म्हणजे रयत आणि रयतेला शिक्षण देणारी संस्था म्हणून संस्थेला रयत शिक्षण संस्था हे नाव दिले. श्रम, स्वावलंबन व समता या तीन तत्त्वांवर शैक्षणिक कार्याचा वटवृक्ष आधारलेला आहे. संस्थेच्या या कार्यात कर्मवीर भाऊराव पाटलांची पत्नी लक्ष्मीबाईंनी त्यांना मोलाची साथ दिली. स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद हे रयत शिक्षण संस्थेचे ब्रीदवाक्य आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावर सामाजिक क्रांतीचे अग्रदूत महात्मा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज व महात्मा गांधी यांच्या कार्याचा व विचारांचा प्रभाव होता.



शिक्षण हेच कर्म आणि समाजसेवा धर्म — कर्मवीर

## द्रष्टा विचारवंत

● १९१० पासून कर्मवीर भाऊरावांनी खादीचे व्रत स्वीकारले व अखेर पर्यंत त्याचे पालन केले .पुणे विद्यापीठ म्हणजेच सध्याचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने भाऊरावांना शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी डि.लीट. ही पदवी देऊन त्यांचा गौरव केला. जनतेने त्यांना कर्मवीर ही उपाधी दिली. भारत सरकारने २६ जानेवारी १९५९ ला कर्मवीर भाऊराव यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित केले. तेव्हा भाऊराव म्हणाले होते, मला जनता जनार्दनाने दिलेली कर्मवीर ही पदवी त्याहून श्रेष्ठ आहे. ते आपल्या नावाखाली रयतसेवक अशी पदवी लावत. मला लाख रुपये देणारा एक व्यक्ती नको, तर एक रुपये देणारी लाख माणसं हवीत, असा दृष्टी असा नवदृष्टिकोन असणारा द्रष्टा विचारवंत म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील होय .९ मे १९५९ रोजी कर्मवीर भाऊराव पाटील यांचे निधन झाले शंभर ते दीडशे वर्षात भाऊरावांसारखा शिक्षण महर्षी जन्माला आला नाही. भारताचे माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू कर्मवीरां विषयी म्हणतात, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात फार मोठी क्रांती केली. महात्मा गांधींनी ही सातारा येथे भाऊराव पाटील यांच्या वसतिगृहास भेट दिली होती. वसतिगृह पाहून ते म्हणाले होते, भाऊराव मी साबरमती आश्रमात जे करू शकलो नाही तो चमत्कार तुम्ही येथे केलात. माजी उपपंतप्रधान स्वर्गीय यशवंतराव चव्हाण म्हणतात कर्मवीरांनी शिक्षणाचा नवीन पायंडा सुरू करून आधुनिक महाराष्ट्र घडवला . १३७ व्या जयंतीनिमित्त या आधुनिक शिक्षण महर्षी, ज्ञान भगीरथ कर्मवीर भाऊराव पाटील यांना भावपूर्ण शब्दांजली.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ **http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com**

# सिनेमॅटिक

**कृष्णधवलच्या काळापासून पड्यावर भूतखेताच्या गोष्टी, भटकणारे आत्मे दाखवले गेले आहेत. भटकणाऱ्या आत्म्यांना अनेक किश्श्यांनी जोडले जाते. कधी पुर्नजन्माच्या माध्यमातून तर कधी तंत्र मंत्रातून तर कधी नायकाच्या इर्षेतून आत्म्यांचा प्रभाव दाखविला जातो. आधुनिक बॉलिवूडमध्ये देखील अशा कथानकांवर आधारित चित्रपट तयार केले जात आहेत आणि त्याला लोकप्रियताही मिळत आहे. मात्र सर्वात मोठा फरक म्हणजे त्याला मनोरंजनाचा तडका मारला जात आहे. कारण आजकालचा प्रेक्षक केवळ घाबरण्यासाठी टॉकीजमध्ये येणार नाही. त्यामुळे प्रेक्षकांचा मूड पाहून भयपट आणले जात आहेत.**

## भयपटांना तडका मनोरंजनाचा

सिनेविशेष









आजकाल भूताखेतांच्या गोष्टींना कधी गंमतीने तर कधी सुडाच्या भावनेने जोडण्यात येते. मात्र अशा गोष्टींचा वाणवा नाही. भयपटांची चलती पाहता राजकुमार राव आणि श्रद्धा कपूर यांच्या 'स्त्री' हॉरर कॉमेडी चित्रपटाने धमाल उडवून दिली. त्याचा सिक्वेल 'स्त्री-२' ने तर पहिल्याच्या तुलनेत प्रेक्षकांवर अधिक प्रभाव पाडला आहे. भुताटकीवरून यापूर्वीही देखील यशस्वी चित्रपट तयार केले आहेत. त्याचा बदलेले रुप 'स्त्री' आणि 'स्त्री दोन'मध्ये पाहवयास मिळाले. फरक एवढाच की पूर्वी प्रेक्षक देखील घाबरत होते, परंतु आता त्याकडे गंमतीची गोष्ट म्हणून पाहत आहेत.

भीतीला मनोरंजनाचे कवच देऊन प्रेक्षकांना चित्रपटगृहाकडे आकर्षित करण्याचा ट्रेंड हा जुनाच आहे. काही चित्रपट यशस्वी ठरले तर काहींनी अनेकांच्या मनात भिती निर्माण केली. अजूनही या चित्रपटांतून चुडेल, नृत्य करणारी मंजुलिका, 'भूतनाथ'मध्ये लहान मुलांचा मित्र होणारी आत्मा, झोंम्बी पाहून पळणारे लोक हे सर्व काही पाहिले गेले. अनुष्का शर्मासारख्या नव्या जमान्यातील अभिनेत्रीने 'फिल्लोरी' मध्ये भूताची भूमिका करत प्रेक्षकांना वास्तवात काय हवे, हे सांगण्याचा प्रयत्न केला. बॉलिवूडच्या इतिहासात पहिला भयपट १९४९ मध्ये झळकला. कमाल अमरोही यांचा 'महल' कमालीचा गाजला. अशोककुमार, मधुबालाच्या चित्रपटात पहिल्यांदा भटकणारी आत्मा दिसली. पण क्लायमेक्समध्ये अशा प्रकारे कोणतिही आत्मा नसून ती एक महिला असते, हे प्रेक्षकांना कळून चुकते. १९६२ मध्ये बीस साल बाद, १९६४ मध्ये वो कौन थी आणि १९६५ मध्ये भूतबंगला हे चित्रपट एकाच पठडीतील होते आणि त्यांनी प्रेक्षकांच्या मनात भिती निर्माण करत मनोरंजन केले.

**भटकणाऱ्या आत्म्यांना भूत केले–** बहुतांश चित्रपटांत भुताटकी किंवा भटकणारी आत्मा यास प्रेमभंगामुळे बदला घेण्याच्या भावनेला जोडले गेले. १९६८ मध्ये 'नीलकमल' हा चित्रपट आत्म्याचीच कहानी सांगणारा होता. मूर्तीकार चित्रसेनच्या कामाने आनंदी होत राजा त्याला वर मागण्यासाठी सांगतो. तेव्हा चित्रसेन हा राजकुमारी नीलकमलला मागतो. त्यामुळे चिडलेला राजा त्याला शिक्षा म्हणून जीवंतपणे भिंतीत गाडतो. पुढच्या जन्मी 'नीलकमल'चा जन्म सीतेच्या रुपातून होतो. तेव्हा चित्रसेनची आत्मा त्याला रात्री बोलावत असते आणि ती देखील देहभान हरपून त्या आवाजाकडे जात असते. या चित्रपटात राजकुमार, मनोजकुमार आणि वहिदा रेहमान यासारखे दिग्गज कलाकार होते.




**केवळ वाईटच नाही तर चांगलेही भूत –**अनेक वर्षांपासून चित्रपटात दोन प्रकारचे भूत दाखविले गेले. एक बदला घेणारे आणि दुसरे मदत करणारे. १९८० आणि १९९० च्या दशकांत रामसे ब्रदर्सने साकारलेले भयपट आजही प्रेक्षकांना भितीदायक वाटतात. भेसूर, अक्राळविक्राळ चेहरा, अस्वलासारखे केस असलेले भूत पडद्यावर आणले. त्यानंतर या भूतांचा शेवट त्रिशूळ किंवा क्रॉसने होताना दाखविला गेला. यादरम्यान मल्टीस्टारर 'जानी दुश्मन' चित्रपट झळकला. यात संजीवकुमार हे असे भूत असते की नववधूची लाल साडी पाहिली की, त्यांच्या अंगातील भूत जागा होत असतो. पण चित्रपटातील भूत हे केवळ नुकसानच करतात असे नाही तर काहीवेळा मदत करणारे भूत देखील दाखविले आहे. भूतनाथ, भूतनाथ रिटर्न आणि 'अरमान'यात अमिताभ बच्चन यांनी अशाच प्रेमळ भूताची भूमिका साकारली. 'हॅलो ब्रदर'मध्ये सलमान खान भूत झाला आणि अरबाजच्या शरीरात प्रवेश करून मदत करताना दाखविला आहे. 'चमत्कार'मध्ये नसिरुद्दीन शहा हे शाहरुख खानला बदला पूर्ण करण्यासाठी मदत करतात. 'भूत अंकल'मध्ये जॅकी श्रॉफ आणि 'वाह लाइफ हो तो ऐसी' मध्ये शाहिद कपूरला 'यमराज' संजय दत्तच्या मदतीने चांगले होताना दाखविले आहे. 'टारझन द वंडर कार'ची कथा देखील अशीच होती. प्यार का साया, मा हे दोन्ही चित्रपट चांगल्या भूतांचे होते.

**बड्या दिग्दर्शकांनी साकारले भूत –** विक्रम भट्टसारख्या बड्या निर्मात्यांना देखील असा भयपट तयार करण्याचा मोह आवरता आला नाही. त्यांनी 'राज'च्या यशानंतर अनेक सिक्वेल तयार केले. १९२०, १९२० ईव्हील रिटर्न, शापित, 'हाँटेड' मध्ये आत्म्याशी भेट घालून दिली. २००३ मध्ये अनुराग बासूसारख्या दिग्दर्शकांनी 'साया' सारखा चित्रपट साकारला. रामगोपाल वर्मा यांच्यासारख्या प्रयोगशील दिग्दर्शकाने 'भूत' नावानेच चित्रपट आणला. त्यानंतर फूंक, फूंक-२, डरना मना है, डरना जरुरी है, वास्तू शास्त्र, भूत रिटर्न देखील आणले. आदित्य सरपोतदार दिग्दर्शित चित्रपट 'मुंज्या' हा देखील हॉरर कॉमेडी चित्रपट आहे. एका खट्याळ आत्म्यावर हा चित्रपट बेतलेला आहे. एक मुलगा काळी जादू करत असताना चुकीने एका वाईट आत्म्याला बंधनातून मुक्त करतो, असे त्याचे कथानक. याच दिग्दर्शकाचा आणखी एक चित्रपट 'ककुडा' देखील हॉरर कॉमेडी चित्रपट होता. प्रियदर्शनचा चित्रपट 'भूलभुलैय्या' (२००७) मध्ये अक्षयकुमार, विद्या बालन आणि शायनी आहुजाने भूमिका केली. या चित्रपटात मंजुलिका नावाची भूत सर्वांना भिती दाखवत असते. चित्रपटाचा सिक्वेल भूलभुलैय्या-२ (२०२२) मध्ये मंजुलिकाचीच कहानी आहे. परंतु नायक अणि नायिका बदलल्या आहेत. सिक्वेलचे दिग्दर्शनही अनिस बाझ्मी यांनी केले आणि कार्तिक आर्यन आणि कियारा अडवानी हे नायक आणि नायिका आहेत. राजकुमार राव आणि जान्हवी कपूरचा हॉरर कॉमेडी चित्रपट 'रुही'चे दिग्दर्शन हार्दिक मेहता यांनी केले आहे.


सत्य घटनांवरचे भयपट

चित्रपटाचा इतिहास पाहिला तर अनेक भयपट प्रदर्शित झाले आणि त्यांनी तिकीटबारीवर दणदणीत यश मिळवले. काही चित्रपट प्रेक्षकांनी नाकारले तर काही भयपट सत्य घटनांवर आधारित आणले. अक्षयकुमारचा 'भूलभुलय्या' हा बंगाली मुलीच्या सत्य घटनेवर आधारित होता. राजकुमार रावचा 'रागिनी एमएसएम' देखील दिल्लीतील एका मुलीवरचा होता. राजकुमार रावचा आणखी एक चित्रपट 'स्त्री' देखील कर्नाटकातील एका गावातील सत्य घटनेवर आधारित आहे. कुणाल खेमूचा 'ट्रिप टू भानगड'मध्ये दाखविलेले दृश्य प्रत्यक्षातही घडलेले आहे. उर्मिला मातोंडकरचा 'भूत' चित्रपट हा मुंबईत राहणाऱ्या एका जोडप्याची खरी कहानी होती. भयपट आवडण्याचे कारण म्हणजे या चित्रपटांतील गुढ प्रत्येकवेळी नव्या रुपातून समोर येते. त्यामुळे सामान्य कथानकांपेक्षा ही कथा वेगळी भासू लागते. म्हणूनच प्रत्येक काळात भयपटांची निर्मिती झाली आणि होत राहिल.

हिंदीप्रमाणे इंग्रजी आणि मराठी चित्रपटांतही भयपटांची चलती राहिली आहे. इंग्रजीतील भयपट हिंदीच्या तुलनेत अधिक भयावह असतात. कॉन्झुरिंग, इन्सेडियस, एव्हिल डेड, रॉंग हाऊस. रॉंग टर्न यासारखे भयपट लहान मुलांना पाहू देण्यास मनाई करतात. मराठीतही अशोक सराफ यांचा एक डाव भूताचा चित्रपट गाजला होता. महेश कोठारे यांचा झपाटलेला तर अजूनही लोकप्रिय आहे. भरत जाधव यांचा 'पछाडलेला' देखील प्रेक्षकांना भावला.

◆◆◆

## यंदा घटस्फोट नाही...



हॉलिवूडचे प्रसिद्ध जोडपे जेनिफर लोपेझ आणि बेन ॲफ्लेक यांच्या नात्याबाबत अनेक दिवसांपासून सोशल मीडियावर चर्चा होती. असेही म्हटले जात होते की लवकरच हे जोडपे घटस्फोट घेणार आहे. मात्र आता या चर्चांना पूर्ण विराम लागला आहे. आता सोशल मीडिया या जोडप्याच्या चाहत्यांनी ते घटस्फोट घेणार नसल्याचा दावा केला आहे. हे दोघेही नुकतेच मुलांसोबत दिसले. सर्वांनी एकत्र ब्रंच केले. यादरम्यान जेनिफर आणि बेन हात पकडताना दिसले. असेही बोलले जात आहे की यावेळी जेनिफर आणि बेनची केमेस्ट्री दिसून आली. त्यांचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या दोघांनी काही आठवड्यांपूर्वी आपलं नातं संपवण्यासाठी घटस्फोटाची याचिका दाखल केली होती.

जेनिफर लोपेझ आणि बेन ॲफ्लेक यांचा एक व्हिडिओ व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये तो पापाराझींना त्याचे फोटो क्लिक करण्यापासून थांबवतानाही दिसत आहे. ब्रंचदरम्यान जेनिफरने तिच्या लग्नाची अंगठीही घातली होती, असेही बोलले जात आहे. या जोडप्याने अद्याप त्यांच्या नात्याच्या सद्य स्थितीबद्दल भाष्य केलेले नाही. हे दोघे त्यांच्या मुलांसह सेराफिना, सॅम्युअल, एमे आणि मॅक्ससह एकत्र आले होते. असे म्हटले जात आहे की, बेनची माजी पत्नी जेनिफर गार्नर ब्रंचनंतर मुलांना घेण्यासाठी आली होती.मीडिया रिपोर्ट्समध्ये असे म्हटले आहे की जेनिफरने घटस्फोटासाठी अर्ज केला कारण बेनने लग्न वाचवण्यात रस दाखवला नाही. जेनिफर हे नाते वाचवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत होती.

◆◆◆

## 'साडे माडे ३' परततोय...




अभिनेते मकरंद अनासपुरे, अशोक सराफ आणि भरत जाधव यांची मुख्य भूमिका असलेला 'साडे माडे ३' हा चित्रपट सुपरहिट ठरला होता. काही दिवसांपूर्वीच या चित्रपटाच्या सिक्वलची घोषणा करण्यात आली होती. नुकताच या चित्रपटाचा मुहूर्त सोहळा पार पडला. याचे फोटो अभिनेता सिद्धार्थ जाधवने सोशल मीडियावर शेअर केले आहेत.

अशोक सराफ, भरत जाधव, मकरंद अनासपुरे आणि सिद्धार्थ जाधव यांच्यासह या चित्रपटात दोन चेहरे झळकणार आहेत. अभिनेता सिद्धार्थ जाधवच्या पोस्टमधून याचा खुलासा झाला आहे. अभिनेत्री रिंकू राजगुरूही या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. तसंच अभिनेता संकेत पाठक देखील महत्त्वाची भूमिका साकारणार आहे.

सिद्धार्थने फोटो शेअर करत त्याने लिहिलं आहे, 'पुन्हा एकदा साडे माडे ३' पुन्हा एकदा' महाराष्ट्रातल्या मेगा सुपरस्टार्सबरोबर काम करायचा योग ....पुन्हा एकदा' मायबाप रसिकांना आनंद देण्याचा घेतलेला वसा, खूप आनंदी आणि उत्साही...लवकरच भेटू.

दरम्यान, या चित्रपटाचं दिग्दर्शन अभिनेता अंकुश चौधरीचं करणार आहे. तसंच चित्रपटाच्या छायाचित्रणाची जबाबदारी संजय जाधव सांभाळणार आहेत. १७ वर्षांपूर्वी रुपेरी पडद्यावर 'साडे माडे तीन' या चित्रपटाने प्रेक्षकांचे मनं जिंकले होते. या चित्रपटातील अशोक सराफ, भरत जाधव आणि मकरंद अनासपुरे हे कुरळे ब्रदर्स सगळ्यांनाच भावले होते. आता 'पुन्हा एकदा साडे माडे तीन' या चित्रपटाद्वारे नव्या कलाकारांसोबत हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

◆◆◆

## प्रियांकाने निभावली मोठी जबाबदारी

'पाणी' चित्रपटाच्या निर्मात्यांनी ट्रेलर रिलीज केला आहे. हा एक मराठी चित्रपट आहे जो लवकरच रिलीजसाठी सज्ज आहे. याद्वारे प्रियांका चोप्रा एक महत्त्वाची जबाबदारीही पार पाडत आहे. बॉलीवूड सुपरस्टार इन्स्टाग्राम हँडलवरून ट्रेलर शेअर केला आहे. अभिनेत्रीने कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, 'हे एका कथेपेक्षा अधिक आहे. ही जगण्याची लढाई आहे.'प्रियांका चोप्राने या चित्रपटाची निर्मिती केली आहे.





या मराठी चित्रपटात प्रियांका चोप्रा अभिनेत्री म्हणून दिसणार नाही. उलट तिने पडद्यामागे काम केले आहे. प्रियांका चोप्रा आणि तिची आई मधु चोप्रा यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे.

प्रियांका चोप्राची निर्मिती कंपनी 'पर्पल पेबल पिक्चर्स'च्या बॅनरखाली याची निर्मिती करण्यात आली आहे. हा चित्रपट महाराष्ट्रातील नांदेडमधील नागदेरवाडी या दुष्काळग्रस्त गावावर आधारित आहे.

आमिर खानची झलकही ट्रेलरमध्ये पाहायला मिळते.हा सामाजिक विषयावर आधारित चित्रपट आहे. पाण्याचे मूल्य समजावून सांगून हा चित्रपट समाजाला एक मोठा आणि खास संदेश देताना दिसणार आहे. प्रियंका चोप्रानेही तिच्या

◆◆◆



## सायबर क्राईमची शिकार

नयनतारा ही साऊथची सुपरस्टार आहे. तिने आपल्या करिअरमध्ये आतापर्यंत अनेक हिट चित्रपट दिले आहेत. या अभिनेत्रीने शाहरुख खानच्या ब्लॉकबस्टर 'जवान'मधून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. आता नयनताराशी संबंधित एक बातमी येत आहे. अभिनेत्री सायबर क्राईमची शिकार झाली आहे. तिचे एक्स अकाउंट हॅक झाले आहे. नयनताराने युजर्सना आवाहन केले आहे की त्यांनी त्यांच्या खात्यातील कोणत्याही विचित्र पोस्टकडे दुर्लक्ष करावे. नयनताराने लिहिले, खाते हॅक झाले आहे. कृपया पोस्ट केल्या जाणाऱ्या कोणत्याही अनावश्यक किंवा विचित्र ट्विटकडे दुर्लक्ष करा.

नयनताराची शेवटची पोस्ट 'जवान'च्या एक वर्षाच्या वर्धापन दिनानिमित्त होती. दरम्यान, चित्रपटाबद्दल बोलायचे झाले तर, भारतात त्याच्या शानदार यशानंतर, शाहरुख खानचा 'जवान' आता




जपानमध्ये मोठ्या पडद्यावर रिलीजसाठी सज्ज आहे. २०२३ चा ॲक्शन-थ्रिलर जवान हा वर्षातील सर्वाधिक कमाई करणाऱ्या भारतीय चित्रपटांपैकी एक होता. ॲटली दिग्दर्शित या चित्रपटात शाहरुख खान, विजय सेतुपती आणि नयनतारा यांच्याशिवाय प्रियमणी, सान्या मल्होत्रा, सुनील ग्रोव्हर, संजीता भट्टाचार्य आणि रिद्धी डोगरा यांच्याही महत्त्वाच्या भूमिका होत्या.

◆◆◆

## ब्रेकअपच्या चर्चांना पूर्णविराम



अभिनेता हृतिक रोशन आणि सबा आझाद यांच्या ब्रेकअपच्या चर्चा मागील दिवसांपासून सुरू आहे. मात्र या चर्चांदरम्यानच पुन्हा दोघेसोबत पाहायला मिळाले आहे. अलीकडेच रोशन कुटुंबात सबाने गणपतीची आरती केली. याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

हृतिक रोशनची बहीण सुनैनाच्या घरी बाप्पाची आरती करताना सबा दिसली. आरती ते विसर्जन असा व्हिडिओ त्यांनी शेअर केला आहे. दरम्यान या व्हिडिओत सबा आजादचीही झलक दिसली. सबा गणेशाची आरती करताना दिसत आहे. तर बाजूला हृतिक उभा आहे. यानंतर विसर्जनावेळीही सबा दिसत आहे. हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या दोघांना एकत्र पाहून चाहतेही खूश आहेत.


◆◆◆

## 'मिर्झापूर'चा कालिन भैय्या बदलणार


मिर्झापूर' या वेब सीरिजचा पहिला सीझन २०१८ मध्ये रिलीज झाला होता, ज्याला लोकांनी खूप पसंती दिली होती आणि त्यानंतर दुसरा सीझन २०२० मध्ये आणि तिसरा सीझन २०२४ मध्ये रिलीज झाला होता. तिन्ही सीझनला लोकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आणि ती OTT ची सर्वात यशस्वी मालिका ठरली.

आता 'मिर्झापूर'चे चाहते चौथ्या सीझनची वाट पाहत आहेत. या मालिकेची केवळ कथाच नाही तर त्यात दिसणाऱ्या पात्रांनीही लोकांच्या हृदयात स्थान निर्माण केले आहे. मग ते दिव्येंदू शर्माने साकारलेले 'मुन्ना भैया'चे पात्र असो किंवा पंकज त्रिपाठीने साकारलेले 'कालिन भैया'. या मालिकेत प्रत्येक पात्राने प्राण दिला.

आता या संदर्भात एक मोठी बातमी समोर आली आहे. असे बोलले जात आहे की, लवकरच पंकज त्रिपाठी यांच्याकडून कालिन भैयाची भूमिका



हिरावून घेतली जाऊ शकते. मात्र, हे मिर्झापूर वेब सीरिजमध्ये नसून मोठ्या पडद्यावर होणार आहे. गेल्या काही दिवसांपासून बातम्या येत होत्या की मिर्झापूर वेब सीरिज हिट झाल्यानंतर



आता निर्माते त्यावर चित्रपट बनवण्याच्या तयारीत आहेत. यासंदर्भात त्याची एक्सेल एंटरटेनमेंटशीही चर्चा सुरू असून अभिनेता हृतिक रोशन या चित्रपटात कालिन भैय्याची भूमिका साकारताना दिसणार आहे.

मिर्झापूरचे दिग्दर्शक गुरमीत सिंग यांनी वेब सीरिजच्या चित्रपट रुपांतराबाबत ना हो म्हटले आहे किंवा त्यांनी या दाव्यांना चुकीचे म्हटले आहे. मिर्झापूर मालिकेत कालिन भैय्याची भूमिका साकारल्यानंतर अभिनेता पंकज त्रिपाठीला लोकांचे खूप प्रेम मिळाले आहे. मात्र, तिसऱ्या सीझनमध्ये त्याची भूमिका फारशी नव्हती आणि लोकांनी याबद्दलही संताप व्यक्त केला.

◆◆◆

रविवार, २२ सप्टेंबर २०२४ पंढरी संचार

# विश्ववेध

## इंटरनेट देणार त्सुनामीची पूर्वसूचना

इंटरनेट केबलचे जाळे समुद्राखाली असू शकते, पण त्याचा वापर वैज्ञानिक आता काही संवेदकांच्या मदतीने खोल सागरात होणाऱ्या भूकंपाचा अंदाज घेण्यासाठी व सुनामीची पूर्वसूचना मिळवण्यासाठी करीत आहेत. खोल समुद्रात असलेले आंतरजालक म्हणजे इंटरनेट हे सुनामी, सागरी प्रदूषण या दोन्हींचा अंदाज देऊ शकते. बफेलो विद्यापीठातील सहायक प्राध्यापक टोमासो मेलोडिया यांनी सांगितले, की सागराखाली खोलवर असलेल्या इंटरनेट जाळ्याची मदत आपण सागराच्या पृष्ठभागाखाली होत असलेल्या घडामोडी टिपण्यासाठी करू शकतो. स्मार्टफोन व संगणकावरही ही माहिती कुणालाही सहज उपलब्ध करून देता येईल व प्राणहानी टाळता येईल.

जमिनीवरून जाणारे आंतरजालक (इंटरनेट) हे रेडिओ लहरींवर चालते ते माहिती उपग्रह किंवा अँटेनामार्फत प्रक्षेपित करीत असते. दुर्दैवाने रेडिओ लहरी या पाण्याखाली प्रभावीपणे काम करू शकत नाहीत, त्यामुळे नेव्ही अँड नॅशनल ओशनिक अॅटमॉस्फेरिक अॅडमिनिस्ट्रेशन या अमेरिकी संस्थेने पाण्याखाली संदेशवहनासाठी ध्वनिलहरींवर आधारित आंतरजालक यंत्रणा चालवण्यासाठी ध्वनिलहरींवर आधारित संदेशवहन तंत्र विकसित केले आहे. जगातील अनेक यंत्रणा हे तंत्र वापरतात, पण प्रत्येक यंत्रणेची पायाभूत सुविधा ही वेगळी असल्याने त्यांच्यात एकमेकांमध्ये माहितीची देवाणघेवाण कठीण असते. नवीन यंत्रणेत हा प्रश्न सोडवण्यात आला असून, पाण्याखालील संवेदक यंत्रणेच्या मार्फत माहितीची देवाण घेवाण केली जाईल. त्यामुळे ही माहिती लॅपटॉप, स्मार्टफोन व इतर वायरलेस उपकरणांमार्फत उपलब्ध होईल.

मेलोडिया यांच्या मते खोल सागरातील आंतरजालक म्हणजे इंटरनेटमुळे अनेक प्रणाली एकत्र जोडून सुनामीचा अंदाज घेता येईल. अतिशय विश्वासार्ह अशी इशारावजा माहिती आपल्याला मिळू शकेल, त्यामुळे किनारी भागातील लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवणे सोपे जाईल. महासागराविषयीची माहितीही मिळेल. तेथील प्रदूषण किती आहे ते समजेल. लष्करी व कायदा अंतर्गत संदर्भातही या नवीन तंत्राचे काही उपयोग आहेत.




## पहिला त्रिमिती चॉकलेट प्रिंटर

आ ‘असावा सुंदर चॉकलेटचा बंगला’च्या चालीवर आता कुणीही ‘असावा आपला चॉकलेटचा पुतळा’ असे म्हणू शकते! याचे कारण म्हणजे एक त्रिमिती मुद्रक किंवा प्रिंटर विकसित करण्यात आलेला आहे. तो जगातील पहिला त्रिमिती चॉकलेट प्रिंटर आहे. एक्सेटर विद्यापीठातील मुख्य संशोधक डॉ. लियांग हाव यांनी त्रिमिती चॉकलेट प्रिंटरची चॉक एज कंपनी स्थापन केली आहे.या प्रिंटरच्या मदतीने वापरकर्त्यांला त्याच्या चेहऱ्याची त्रिमिती प्रतिमा चॉकलेटमध्ये बनवता येईल. यामध्ये प्रिंटिंग हेड हे सजावटीच्या चॉकलेट मिश्रणाने भरता येतील. किमान १५-३० मिनिटे घेऊन हा प्रिंटर अतिशय आकर्षक पद्धतीने चॉकलेटवर तुमची त्रिमिती प्रतिमा छापून देतो. या यंत्रामुळे ०.५ मि.मी. ते १.५ मि.मी. इतक्या पातळीवर चॉकलेटच्या रेषा आखता येतात.

चॉकलेटचे थर केक किंवा बिस्किटवर तयार ...रता येतात. ...ाच्या मदतीने ...विध आकार, ...झाइन, लोगो ...ढता येतात. ...ामुळे काही ...पन्या पुढे तुम्हाला ...तिमा भेट देऊन



नवे मार्केटिंग तंत्र अवंलबू शकतील. कारण ग्राहकाच्या चेहऱ्याचा त्रिमिती चॉकलेटी पुतळा ही त्याला अनोखी भेट असू शकेल. हा प्रिंटर जगभरात उपलब्ध केला जाणार आहे. त्यामुळे आता हौशी चॉकलेट हिरोंची संख्याही वाढणार आहे. चॉकलेटच्या रूपातील तुमच्या प्रिय व्यक्तीची प्रतिमा तुम्ही त्या व्यक्तीला भेट देऊ शकता असाही या तंत्रज्ञानाचा उपयोग आहे. हा प्रिंटर संगणकाच्या युएसबीला जोडून आकर्षक अशा चॉकलेट सजावटी डाऊनलोड करू शकता. तुमची छबी डाऊनलोड करून अगदी हुबेहूब तुमच्या चेहऱ्याचा त्रिमिती पुतळा चॉकलेटच्या माध्यमातून तयार करू शकता.

## चंद्रावर पाणी पृथ्वीमुळेच?

चंद्र कोरडाठाक आहे असे पूर्वी मानले जात होते; मात्र विज्ञानातील धारणाही कायमस्वरूपी राहत नाहीत. भारताच्याच चांद्रयान-१ या मोहिमेतच चंद्रावर पाण्याचे अस्तित्व असल्याचे सिद्ध झाले होते. चंद्राच्या प्राचीन खडकात आढळून आलेले पाणी हे मूळ पृथ्वीवरचे आहे. पृथ्वीशी एका खगोलाच्या आघातामुळे चंद्राची निर्मिती झाली तेव्हाही ते नष्ट न होता तसेच राहिले, असे एका संशोधनात म्हटले आहे.



चंद्राच्या आंतरभागासह बराच भाग अपोलो मोहिमेच्या वेळी दिसून आला त्यापेक्षा ओलसर असल्याचे लक्षात आले आहे. ब्रिटनमधील द ओपन युनिव्हर्सिटीच्या जेसिका बार्नेस व त्यांच्या सहकाऱ्यांनी चंद्रावरील कवचात असलेल्या अॅपटाइट, कॅल्शियम फॉस्फेट या खनिज द्रव्यातील पाण्याच्या प्रमाणाचा शोध घेतला असता त्यांना असे दिसून आले की, यातील अनेक खडक हे फार प्राचीन म्हणजे पृथ्वीवर आढळलेल्या खडकांपेक्षा जुन्या काळातील आहेत. त्यामुळे हे खडक चंद्रावरील पाण्याचा शोध घेण्यास उपयुक्त आहेत. चंद्राची निर्मिती साडेचार अब्ज वर्षांपूर्वी झाली होती त्या वेळी तेथे पाणी होते. सौरमालेतून पाणी नेमके कुठून आले याचाही शोध या खडकांच्या नमुन्यांच्या आधारे घेता येतो. चंद्रावरील अॅपटाइट खनिजाच्या स्फटिकात्मक रचनेत पाणी लक्षणीय प्रमाणात दिसून येते असे बार्नेस व त्यांच्या सहकाऱ्यांनी म्हटले आहे. या खडकातील हायड्रोजन समस्थानिकाचे विशिष्ट गुणधर्मही तपासण्यात आले असून त्याची मदत पाण्याचा स्रोत ओळखण्यासाठी घेतली गेली. हायड्रोजन समस्थानिकाचे हे गुणधर्म पृथ्वीवरील व काही काबरेनेशियस चोंड्राइट उल्कापाषाणासारखेच आहेत. चंद्रावरील नमुन्यात असलेली हायड्रोजन रचना व पृथ्वीवरील जलसाठ्यातील हायड्रोजनची रचना यात साम्य आहे, त्यामुळे चंद्र व पृथ्वी यांच्यातील पाण्याचा स्रोत एकच आहे. अपोलो मोहिमेच्या वेळी चंद्रावरील काही खडक आणण्यात आले होते, त्यांच्या आधारे बार्नेस यांनी केलेले संशोधन युरोपियन प्लॅनेटरी सायन्स काँग्रेसमध्ये लंडन येथे सादर करण्यात आले.

## पृथ्वीला ‘धडकला’ लघुग्रह

कोट्यवधी वर्षांपूर्वी एका लघुग्रहाच्या धडकेने पृथ्वीवरील डायनासोर तसेच अन्य अनेक प्राण्यांच्या प्रजाती नष्ट झाल्या होत्या. अर्थात, हा लघुग्रह आकाराने मोठा होता व त्याच्या धडकेची खूण आजही मेक्सिकोमधील चिक्सुलब क्रेटरच्या रूपाने पाहायला मिळते. पृथ्वीला अलीकडेच एका लघुग्रहाची धडक झाली; पण हा लघुग्रह आकाराने इतका लहान होता की, त्याची दखल जगाने फारशी घेतलीही नाही. ‘२०१४ आरडब्ल्यू १’ नावाचा हा लघुग्रह भारतीय वेळेनुसार बुधवारी रात्री दहा वाजून नऊ मिनिटांनी फिलिपाईन्सच्या लुजोन नावाच्या बेटावरील आसमंतात आला. अर्थातच, पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करताच तो जळाला आणि एखाद्या आगीच्या गोळ्यासारखा खाली आला. सुमारे १ मीटर व्यासाचा हा लघुग्रह कॅटालिना स्काय सर्व्हेने सर्वप्रथम बुधवारी सकाळी शोधला होता. जळून जाण्यापूर्वी तो ताशी ६३,३६० किलोमीटर वेगाने फिलिपाईन्सच्या सर्वात उत्तरेकडील बेटाच्या आसमंतात चमकत होता.



खगोलशास्त्रज्ञांच्या एका अनुमानानुसार, अशा आकाराचे लघुग्रह दर दोन आठवड्यांमध्ये पृथ्वीला धडकत असतात. ते वातावरणात प्रवेश करण्यापूर्वी त्यांना पाहता येणे कठीण असते. ‘नासा’ने आधीच सांगितले होते की, या चिमुकल्या लघुग्रहाचा पृथ्वीला किंवा पृथ्वीच्या वातावरणालाही धोका नाही. उत्तर फिलिपाईन्सच्या पूर्व तटाजवळ ही अवकाशीय शिळा आगीच्या गोळ्याच्या रूपाने खाली येईल, असेही ‘नासा’ने म्हटले होते. असा ‘आगीचा गोळा’ पाहण्याची संधी खगोलशास्त्रज्ञांना मिळणार होती; पण उत्तर फिलिपाईन्सला प्रभावित करणाऱ्या टायफून यागीने यामध्ये अडचण आणली. हे वादळ तिसऱ्या श्रेणीचे होते व त्यामुळे आकाशात ढगांची दाटी झाली होती. त्यामुळे हा जळता लघुग्रह खाली येत असतानाचे दृश्य स्पष्टपणे पाहता आले नाही. अशा छोट्या आकाराच्या लघुग्रहांचा पृथ्वीला कोणताही धोका नसतो; मात्र या घटनेने वैज्ञानिक संशोधनासाठी एक महत्त्वाचा डेटा दिलेला आहे. पृथ्वीच्या जवळील छोट्या वस्तूंची ओळख करणाऱ्या सध्याची ट्रेकिंग सिस्टीमची क्षमता यामुळे दिसून आली. अधिकाऱ्यांनी लुजोन आणि आसपासच्या क्षेत्रामधील रहिवासींना सतर्क राहण्याची सूचना दिली होती; मात्र घटनेनंतर जळालेल्या लघुग्रहाचे अवशेष कुठे पडले किंवा त्यामुळे कुणाला दुखापत झाली का, याची माहिती मिळू शकली नाही.

## सर्वात पातळ काच!

जगातील सर्वात पातळ काच कुठे शोधण्यात आली हे तुम्हाला माहिती आहे का? अपघातानेच हा शोध लागला होता व या काचेची जाडी दोन अणूंइतकी आहे. कॉर्नेल व जर्मनीच्या उल्म विद्यापीठाच्या संशोधकांनी शोधलेली काच ही सर्वात पातळ काच म्हणून गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस् मध्ये नोंदली गेली आहे. या काचेचे तावदान इतके पातळ आहे, की त्याचे सिलिकॉन व ऑक्सिजन रेणू हे इलेक्ट्रॉन सूक्ष्मदर्शिकने दिसले, असे प्रा. डेव्हिड म्यूलर यांनी सांगितले. केवळ दोन अणूंइतकी जाडी व द्विमिती हे या काचेचे वैशिष्ट्य असून हा अपघाताने लागलेला शोध आहे, असे ते म्हणाले. जगात प्रथमच काचेची रचना पाहता आली याचा आपल्याला अभिमान वाटतो, असे म्यूलर यांनी सांगितले. या द्विमिती काचेचे उपयोग ट्रान्झिस्टर, अतिशय पातळ घटक जे संगणक व स्मार्टफोनच्या संस्कारकाची क्रिया आणखी बदलून टाकतील. नॅनो लेटर्स या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झालेले आहे. वैज्ञानिक ग्राफिन कार्बन अणूंचे द्विमितीय तावदान तयार करीत असताना स्फटिक तयार झाले, पण त्या ग्राफिनवर घाणीसारखा पदार्थ जमलेला दिसला. नंतर निरीक्षण केले असता ती काच होती व सिलिकॉन ऑक्सिजनच्या अणूंनी बनलेली होती. या प्रयोगातून सुटलेली हवा तांब्याला क्वार्टझ् स्फटिकाशी क्रिया करायला भाग पाडत होती. क्वार्टझ हे सिलिकॉन व ऑक्सिजनचे बनलेले असते. हा काचेचा थर शुद्ध ग्राफिनवर तयार झाला. वैज्ञानिकांना यामुळे काचेच्या मूलभूत स्वरूपाविषयी माहिती मिळाली. वैज्ञानिकांना ही काच तयार झाले सहज दिसली नाही. ही काच घन अवस्थेसारखी वागते, पण ती द्रव आहे. वैज्ञानिकांना काचेच्या अणूंची छायाचित्रे मिळाली असून ती १९३२ मध्ये काचेच्या अणुरचनेवर संशोधन केलेल्या डब्ल्यू एच झशारियासेन यांनी सांगितलेल्या रचनेशी मिळतीजुळती आहे.





## चंद्रावरील खडकांत पुरावे

प्राचीन काळात पृथ्वीचे वातावरण कसे होते, याचे सर्वात जुने पुरावे हे पृथ्वीचा एकमेव नैसर्गिक उपग्रह असलेल्या चंद्रावरील खडकांमध्ये दडलेले आहेत. एका नव्या संशोधनातून ही माहिती समोर आली. नासाच्या अपोलो मोहिमेत चांद्रभूमीवरून आणलेल्या खडकांच्या अभ्यासातून ही बाब स्पष्ट झाली. ५० वर्षांपूर्वी हे खडकांचे नमुने अपोलो मोहिमेतील अंतराळवीरांनी पृथ्वीवर आणले होते.

या खडकांमध्ये चुंबकीय गुणधर्मही अडकलेले आहेत. एके काळी पृथ्वीप्रमाणेच चंद्रालाही स्वतःचे चुंबकीय क्षेत्र होते, हे यावरून स्पष्ट होते. रॉचेस्टर युनिव्हर्सिटीतील जॉन टार्जुनो यांनी सांगितले, की एखाद्या ग्रहाच्या किंवा चंद्राच्या कोअरमधून असे चुंबकीय क्षेत्र निर्माण होत असते. चंद्राचा कोअर अतिशय छोटा आहे हे याठिकाणी उल्लेखनीय आहे. चंद्राकडे स्वतःचे चुंबकीय क्षेत्र गेल्या किमान ४. ३६ अब्ज वर्षांपासून नाही, असेही या नव्या संशोधनातून स्पष्ट झालेले आहे. याबाबतच्या संशोधनाची माहिती ‘‘कम्युनिकेशन्स अर्थ अँड एन्व्हायन्मेंट या नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यामध्ये म्हटले आहे, की चंद्राची निर्मिती झाल्यापासून सुरुवातीची केवळ १४० दशलक्ष वर्षेच चंद्राला चुंबकीय क्षेत्राचे संरक्षण मिळाले. त्यामुळे चंद्रामध्ये अजूनही पृथ्वीच्या सुरुवातीच्या काळातील वातावरणाचे पुरावे सुरक्षित असू शकतात, जे कधीच पृथ्वीवरून पुसले गेले आहेत. ४.३६ अब्ज वर्षांपूर्वी चंद्राने पृथ्वीच्या वातावरणाचे आयन्स टिपलेले असू शकतात. सुरुवातीच्या काळात पृथ्वीच्या वातावरणाचे स्वरूप कसे होते, हे जाणून घेण्यासाठी त्याची मदत होऊ शकते.

## शनीची कडी गायब होणार

आपल्या सौरमालिकेतील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा ग्रह म्हणजे शनी. शनीच्या शंभरपेक्षाही अधिक चंद्रांमुळे तसेच त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण अशा कडीमुळे तो खगोलप्रेमींमध्ये अधिक प्रसिद्ध आहे. शनीची ही कडी एक खगोलीय चमत्कारच आहे. अब्जावधी बर्फाळ कण आणि छोट्या खडकांच्या तुकड्यांपासून बनलेली ही कडी त्याच्याभोवती फिरत असते. ही शनीची कड़ी पुढील वर्षी म्हणजेच २०२५ मध्ये गायब होईल. अर्थात ती वास्तवात गायब होणार नसून पृथ्वीवरून ती पाहता येणार नाही.



ही घटना सर्व ग्रहांच्या एका सरळ रेषेत येण्याच्या खगोलीय घटनेशी संबंधित आहे. शनी २६.७ अंशात झुकलेल्या अक्षावर फिरतो आणि पृथ्वीवरून त्याच्या कडीचे दृश्य कालौघात बदलत राहते. जसे जसे शनीचा अक्ष झुकत जातो तसे ही कडी आपल्या दृष्टीत पातळ होत जाते. एक वेळ अशी येते की पृथ्वीवरून ही कडी दिसतही नाही. अशा वेळी असे वाटते की जणू काही शनीने आपली प्रसिद्ध कडी गमावली आहे! अर्थात हे परिवर्तन अस्थायीच असते. शनी सूर्याभोवती परिक्रमा करीत असताना दर २९.५ वर्षांनी अशी स्थिती येत असते. शनीच्या अक्षातील अशा झुकण्यामुळे ही कडी मार्च २०२५ नंतर पुन्हा पूर्णपणे दिसू लागेल; मात्र नोव्हेंबर २०२५ मध्ये ती पुन्हा पूर्णपणे गायब होईल. ही कड़ी २०३२ पर्यंत पुन्हा पूर्णपणे दिसू लागेल. दक्षिण कॅलिफोर्निया रिवद्यापीठातील खगोलशास्त्रज्ञ वेह पेरूमियन यांनी सांगितले की दर १३ ते १५ वर्षांमध्ये पृथ्वी शनीच्या कडीला तिच्या काठावरून पाहते. याचा अर्थ ती अतिशय कमी प्रकाश परावर्तित करते आणि ती पाहता येणे कठीण होते. त्यामुळे ती जणू काही अदृश्यच होऊन जाते !



## तापमानवाढीमुळे चांदी नष्ट होणार?

जागतिक तापमानवाढीचे अनेक परिणाम आजपर्यंत समोर आलेले आहेत. आता चांदी या मौल्यवान धातूबाबतचाही एक परिणाम समोर आलेला आहे. दक्षिण चीन समुद्राच्या तळाशी असलेल्या गाळात जागतिक तापमानवाढीमुळे मोठ्या प्रमाणात चांदीचे खनिज गाडले जात असल्याचे संशोधकांनी म्हटले आहे. हाच प्रकार जगभरातील महासागरांमध्येही घडू शकतो.

व्हीएतनामच्या किनारपट्टीलगत दक्षिण चीन समुद्राच्या गाळात सन १८५० पासूनच चांदीचे खनिज अडकत गेले असल्याचे एका नव्या संशोधनातून दिसून आले आहे. त्याला औद्योगिक क्रांतीनंतरच्या स्थितीची जोड मिळाली, औद्योगिक क्रांतीनंतर जगभरात कारखाने वाढले आणि हवेत ग्रीनहाऊस वायू मिसळत जाऊन पृथ्वीचे तापमान वाढत गेले. चीनमधील हेफेई युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजीच्या डिपार्टमेंट ऑफ जिओसायन्समधील सहायक प्राध्यापक लिकियांग झू यांनी याबाबतचे संशोधन केले आहे. महासागरांमधील चांदीच्या खनिजाचे चक्र आणि जागतिक तापमानवाढ यामधील संभाव्य संबधांवर यानिमित्ताने प्रथमच प्रकाश टाकला जात आहे. जागतिक तापमानवाढीचे अद्याप विचारातही न घेतलेल्या द्रव्यांवरही परिणाम होऊ शकतात याचे संकेत यामुळे मिळाले. त्यामध्ये कोबाल्ट, झिंक आणि आयर्नचा समावेश होतो. अन्य काही पदार्थांप्रमाणेच चांदीची निर्मिती ही जमिनीत होते आणि पावसामुळे पाणी खनिजांच्या खडकांमधून जाऊन तसेच ते नद्यांमधून प्रवाहित होऊन अशी चांदी समुद्रात जाते.



नद्यांचे मोठे प्रवाह तसेच अन्य काही कारणांमुळे महासागरांचे काही विशिष्ट भाग अशा चांदीच्या मोठ्या साठ्यांनी संपन्न झालेले आहेत. चांदी ही तिच्या आयोनिक रूपात (एजी प्लस) सागरी जलचरांसाठी घातक ठरते. मात्र मोठ्या प्रमाणातील सागरी इकोसिस्टिमवर तिचा कसा परिणाम होतो याबाबतची अतिशय तुरळक माहिती उपलब्ध आहे. सागरी पर्यावरणावर चांदीचा कसा प्रभाव पडतो हे जाणून घेण्यासाठी झू आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी व्हीएतनामजवळ समुद्रतळाशी असलेल्या गाळाचे काही नमुने अभ्यासासाठी घेतले होते.

## ३०-३५ जागांसाठी दोन्ही-तिन्ही पक्ष आग्रही

# मविआची पहिली चर्चा पूर्ण

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाविकास आघाडीची जागावाटपाची पहिल्या टप्प्याची चर्चा पूर्ण झाली असून तिढा असलेल्या जागांवर आता दुसऱ्या टप्प्यात चर्चा होईल. तिढा असलेल्या जागांबाबत वरिष्ठ नेत्यांच्या बैठकीत अंतिम निर्णय घेतला जाईल. त्यासाठी तीनही पक्षांकडून एकत्र सर्व्हे केला जाईल. ३०-३५ जागांसाठी दोन्ही तिन्ही पक्ष आग्रही असल्याने यातल्या जागा दुसऱ्या टप्प्यात चर्चेसाठी घेतल्या जातील. काही जागांमध्ये अदलाबदल केली जाणार आहे.

महाविकास आघाडी लवकरच नेत्यांचे दौरे आणि संयुक्त मेळाव्याबद्दल कार्यक्रम जाहीर करणार आहे. महाविकास आघाडी लवकरच संयुक्त मेळावे आणि नेत्यांच्या दौऱ्यांच्या कार्यक्रमाचे नियोजन करून विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचाराच्या रिंगणात उतरणार आहे.२०१९ ला जिंकलेल्या जागांमध्ये बहुतांश जागा या त्या पक्षालाच ठेवण्यावर चर्चा सकारात्मक झाल्याची माहिती आहे. काही जागांमध्ये अदलाबदल केली जाणार आहे. साधारणपणे ३० ते ३५ जागांमध्ये दोन किंवा तीन पक्ष आग्रही असल्याने यातील जागा दुसऱ्या टप्प्यात चर्चेसाठी घेणार आहे. महाविकास आघाडी लवकरच नेत्यांचे दौरे आणि संयुक्त मेळाव्याबद्दल कार्यक्रम जाहीर करणार आहे.भाजप-शिवसेना (शिंदे गट) सरकारचा कार्यकाळ नोव्हेंबर २०२४ मध्ये संपणार आहे. सध्या महाराष्ट्रात भाजप-शिंदे गटाचे सरकार आहे. त्याचा कार्यकाळ नोव्हेंबर २०२४ मध्ये संपत आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये निवडणुका होऊ शकतात. २०१९ मध्ये महाराष्ट्रात विधानसभेच्या २८८ जागांवर निवडणुका झाल्या. १०६ आमदारांसह भाजप राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला होता.

### सत्ता कोणाची याची उत्कंठा

● मे २०२२ मध्ये, महाराष्ट्र सरकारचे नगरविकास मंत्री आणि शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी ३९ आमदारांसह बंडखोरी केली. ३० जून २०२२ रोजी एकनाथ शिंदे यांनी विसावे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. शिवसेना दोन गटात विभागली गेली. १७ फेब्रुवारी २०२३ रोजी निवडणूक आयोगाने पक्षाचे नाव 'शिवसेना' आणि पक्षाचे निवडणूक चिन्ह 'धनुष्यबाण' शिंदे गटाकडेच ठेवण्याचे आदेश दिले. आता पुढची सत्ता कोणाची याची उत्कंठा आहे.

इन्फोग्राफिक्स

## अमित शाह २५ ला नाशिक दौऱ्यावर

**नाशिक :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह २५ सप्टेंबर रोजी नाशिक दौऱ्यावर येत असून या वेळी ते उत्तर महाराष्ट्राचा आढावा घेणार



आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला उत्तर महाराष्ट्रातील आजी-माजी मंत्री, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, बाहेरील राज्यातून आलेले प्रभारी उपस्थित राहणार आहेत. लोकसभा निवडणुकीत उत्तर महाराष्ट्रात ८ पैकी केवळ २ जागांवर महायुतीचा विजय झाल्याने भाजप विधानसभेसाठी नव्याने रणनीती आखणार आहे. अमित शाह यांच्या दौऱ्याचे नियोजन करण्यासाठी रावसाहेब दानवे नाशिकला येणार आहेत. या दौऱ्यात एकनाथ खडसे यांच्या प्रवेशाबाबत निर्णय होणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. गेल्या काही महिन्यांपासून ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे भाजपमध्ये आहेत की शरद पवारांच्या राष्ट्रवादीत? यावरून राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा रंगल्या होत्या. त्यातच खडसे यांनी गौप्यस्फोट केले होते. भाजपच्या अतिवरिष्ठ नेत्यांनी मला पक्षात पुन्हा प्रवेश करण्याविषयी विचारले होते. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांच्या उपस्थितीत माझा पक्षप्रवेशही झाला होता. मात्र, यानंतर भाजपने त्याबाबत घोषणा केलीच नाही. आता भाजपच्या पक्ष प्रवेशावर फुली मारल्याचे त्यांनी म्हटले होते. खडसेंच्या वक्तव्यानंतर उपमुख्यमंत्री देवेन्द्र फडनवीस यांनी खडसे यांच्या प्रवेशाबाबत गणेशोत्सवानंतर योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे स्पष्टीकरण दिले होते. आता केंद्रीय मंत्री शाह यांच्या दौऱ्यात खडसेंच्या पक्ष प्रवेशावर चर्चा होणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

» Selected

## काँग्रेस शिष्टमंडळाची तक्रार

**मुंबई :** काँग्रेस शिष्टमंडळाने राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची राजभवन येथे भेट घेत राज्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे ढासळल्याचा आरोप केला. विदर्भ आणि मराठवाडा येथे अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले. पण अद्याप मदत मिळाली नाही. शेतकरी वर्गात मोठा संताप आहे असे राज्यपालांच्या निदर्शनास आणून देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळला. अजून कारवाई झालेली नाही. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या विरोधात सत्ताधारी आमदारांनी आणि खासदारांनी हिंसक विधानं केली. बाळासाहेब थोरात, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, मुंबई काँग्रेस अध्यक्ष खा. वर्षाताई गायकवाड, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, खा. चंद्रकांत हंडोरे, विशाल पाटील, आ. अस्लम शेख आदी उपस्थित होते.

## जे करायचे ते शांततेने करा !

**मुंबई :** जालन्याच्या वडीगोद्रीत मराठा आणि ओबीसी आंदोलक आमने सामने उभे ठाकले. लक्ष्मण हाकेंच्या उपोषणस्थळी घोषणाबाजी झाली. लोकशाहीमध्ये कोणाला कुठे बसायचे उपोषणाला मी काय सांगणार? अशी प्रतिक्रिया मंत्री छगन भुजबळ यांनी दिली. ते म्हणाले, जे काय करायचं ते शांततेने करा. कायदा सुव्यवस्थेचा शांततेचा भंग होणार नाही याची काळजी घ्या. लोकांना त्रास होणार नाही याची काळजी घ्या. लोकशाहीमध्ये अहिंसक आंदोलन करण्याची परवानगी आहे. मराठा आंदोलक आणि शंभुराज देसाई यांच्या आग्रहानंतर मनोज जरांगे यांनी रात्री सलाईनद्वारे उपचार घेतले, त्यावर भुजबळ यांनी थेट प्रतिक्रिया देणे टाळले. शंभूराज देसाईंची जरांगेंसोबत संवादाची माहिती सोमवारी देणार आहेत. ते काय माहिती देतील त्यावेळी पाहू, असे भुजबळ म्हणाले.

# रास्ता रोकोमुळे वडीगोद्रीत तणाव

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**वडीगोद्री :** येथे ओबीसी आंदोलकांनी रस्ता रोको केल्यामुळे पुन्हा एकदा तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे. पोलिसांनी आंदोलकांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. शिवाय संतप्त आंदोलकांनी पोलिसांशी हुज्जत देखील घातली. कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांनी काल रात्रीपासूनच अंतरवाली सराटीजवळ चोख बंदोबस्त ठेवला.

अंतरवाली सराटी आणि वडीगोद्रीचा रहदारीचा रस्ता एकच आहे. मराठा आंदोलक अंतरवाली सराटीकडे जात असताना ओबीसींकडून रस्ता रोको करण्यात आला. त्यामुळे

त्यामुळे मराठा ओबीसी आंदोलक आमने-सामने आल्याचे चित्र आहे. ओबीसी आंदोलकांनी रस्ता रोको केल्यामुळे पोलीस मराठा आंदोलकांना पर्यायी मार्ग उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला. काही आंदोलक वडीगोद्री येथे जाण्याचा आग्रह करत आहेत. त्यामुळे घोषणाबाजी करत दोन्हीकडील आंदोलक आमने-सामने आले.

### ...तर फडणवीस - भुजबळ जबाबदार

● मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील म्हणाले, दंगल घडली तर भुजबळ, फडणवीस जबाबदार राहतील. रस्ता अडवून चालणार नाही. आम्ही इज्जत करतो, दादागिरी करायची नाही. अंतरवालीमध्ये येणाऱ्या मराठा समाजातील नागरिकांनी ज्या रस्त्याने आले त्याच रस्त्याने जायचे. काही अनुचित प्रकार घडला आणि दंगल झाली तर याला आमची जबाबदारी नाही. भुजबळांचे ऐकू नका. मराठ्यांनी शांततेत यायचे. पण, आग्या मोहोळ शांत होत नसते.

● जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली. सकल मराठा समाजाकडून छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याला अभिवादन करून मराठा समाज बांधव आंतरवाली सराटीकडे रवाना होणार आहेत. बीड जिल्हा मराठा आरक्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे.

# अंगणवाडीच्या पोषण आहारात अळ्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जळगाव :** शहरातील एका अंगणवाडीच्या पोषण आहारात अळ्या आढळल्या. हरी विठ्ठल नगर भागात असणाऱ्या अंगणवाडीत ही घटना घडली. यामुळे पालकांनी संताप व्यक्त केला आहे. या संदर्भात कारवाई करण्याचे आदेश आयुक्तांकडे असल्याची माहिती जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी दिली आहे.

हरिविठ्ठल नगरात बालविकास प्रकल्प अधिकारी




अंतर्गत सुरू असलेल्या अंगणवाडी क्रमांक ६१ मध्ये दिल्या जाणाऱ्या पोषण आहाराच्या खिचडीत अळ्या आढळल्या. प्रकल्प अधिकाऱ्यांकडे याबाबत तक्रार करण्यात आली आहे. शिवाय, पोषण आहाराचा नमुना तपासणीसाठी लॅबमध्ये पाठवण्यात आला आहे.

या अंगणवाडीत ५० बालके व बालिका येतात. बालकांसाठी श्री सद्गुरू महिला बचत गटाकडून आहार पुरवण्यात येतो. सकाळी अंगणवाडीतील बालकांना डब्यात पोषण आहारातील खिचडी देण्यात आली. कनिष्का बोरसे या मुलीच्या खिचडीत अळ्या आढळून आल्या आहेत. पोषण आहार विद्यार्थ्यांच्या जीवावर उठलाय का? असा संतप्त सवाल पालकांनी उपस्थित केला.

अंगणवाडीमध्ये तयार होणाऱ्या आहारासंदर्भात काळजी घेण्याचे सूचना या आयुक्तांकडून प्राप्त होत असतात. त्यासाठी जिल्हास्तरावर एक समिती देखील तयार करण्यात आली आहे. जर अशा पद्धतीने आहारात काही सापडले तर त्याची पूर्ण बॅच नष्ट केली जाते. तसेच याबाबत दक्षता घेण्याच्या सूचनादेखील अंगणवाडी सेविकांना वारंवार दिलेल्या असतात. त्यामुळे आजपर्यंत बालकांना कुठल्याही प्रकारचा त्रास या आहारापासून झालेला नाही. यासंदर्भात कारवाई करण्याचा अधिकार आयुक्त कार्यालयाला आहे.

# मुंबई विद्यापीठ निवडणुका तातडीने

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**मुंबई :** मुंबई विद्यापीठाने सिनेटच्या निवडणुका पुढे ढकलल्याच्या विरोधात शिवसेना ठाकरे गटाने हायकोर्टात याचिका दाखल केली होती. हायकोर्टाने मुंबई विद्यापीठाला फटकारले आहे. त्यामुळे सिनेटच्या निवडणुका उद्याच घ्याव्या लागणार आहेत.

मुंबई विद्यापीठाची सिनेट निवडणूक दुसऱ्यांदा स्थगित केल्यानंतर ठाकरे गटाने हायकोर्टात धाव घेतली होती. त्यामुळे आता रविवारी २२ सप्टेंबरलाच मुंबई विद्यापीठाची निवडणूक होणार आहे. मुंबई विद्यापीठाने परिपत्रक काढत निवडणुका पुढे ढकल्याचा निर्णय़ घेतला होता. यावरुन विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका केली आहे. आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर एवढे घाबरट, गद्दार मुख्यमंत्री याआधी कधीही पाहिलेले नाहीत, अशा शब्दात हल्लाबोल केला. सरकारच्या मनात भीती असल्याने त्यांना विधानसभेच्या आधी कोणतीही निवडणूक घ्यायची नाही. ते डरपोक आहेत. त्यांना निवडणुकीला सामोरे जायचे नाही. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका अजूनही झालेल्या नाहीत. मुंबई विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीतही ते हरतील, हे त्यांना माहिती आहे. त्यामुळेच ते निवडणुका घेत नाहीत", असा आरोपही ठाकरे यांनी केला आहे.



पंढरी संचार छायाचित्रसेवा

## धारावीकर झाले आक्रमक

धारावी परिसरात असलेल्या एका धार्मिक स्थळाचा अनधिकृत भाग तोडण्यासाठी मुंबई महापालिकेचे पथक पोहोचले. या पथकाला पाहताच धारावीकरांनी आक्रमक रुप घेतले.

## कडूंबरोबर जमणार नाही : आंबेडकर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यात तिसऱ्या आघाडीबाबत चर्चा सुरु आहे. संभाजीराजे छत्रपती, राजू शेट्टी, बच्चू कडू यांची बैठक पार पडली. यावेळी प्रकाश आंबेडकर यांनाही तिसऱ्या आघाडीत घेण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याचे राजू शेट्टी म्हणाले होते. त्यावर आंबेडकर यांनी बच्चू कडूंबरोबर आमचं जमू शकत नाही, असं स्पष्टपणे सांगितलं आहे.ते म्हणाले की, प्रकाश शेंडगे यांच्याकडून आम्हाला अजून तसा प्रस्ताव आलेला नाही. वंचित बहुजन आघाडी आणि ओबीसी संघटना जिल्हा जिल्ह्यातील कमिटी उमेदवार ठरवणार आहेत.

# पवार गटाचा नाशिकमध्ये १० जागांवर दावा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली आहे. राज्यात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा सामना रंगणार आहे. महायुती आणि महाविकास आघाडीत जागा वाटपावर चर्चा सुरु असतानाच नाशिकच्या जागांवरून आता महाविकास आघाडीत बिघाडी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

नाशिकच्या जागांवरून महायुतीत मिठाचा खडा पडल्याचे दिसून आले. या पाठोपाठ आता महाविकास आघाडीतदेखील नाशिकच्या जागांवरून संघर्ष होणार असल्याचे दिसून येत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने शिवसेना ठाकरे गटाच्या जागांवर दावा ठोकला आहे. जिल्ह्यातील १५ पैकी १० जागा लढण्यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट ठाम आहे. शिवसेना ठाकरे गटाने नाशिक मध्य विधानसभा मतदारसंघातून माजी आमदार वसंत गिते आणि नाशिक पश्चिम विधानसभा मतदारसंघातून जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर यांची नावे विधानसभेसाठी निश्चित केली आहेत. मात्र, शरद पवार गटाने या दोन्ही जागांवर आपला दावा सांगितला आहे. शहरातील ३ पैकी २ जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष लढण्याच्या तयारीत आहे. २३ सप्टेंबरपासून राष्ट्रवादी काँग्रेसची जन स्वराज्य यात्रा तीन दिवस नाशिकमध्ये येणार आहे. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ नेते जिल्ह्यातील मतदारसंघाचा आढावा घेणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या दाव्यामुळे महाविकास आघाडीच्या तिन्ही पक्षात वाद उद्भवणार असल्याचे दिसून येत आहे.दरम्यान, शिवसेना शिंदे गटाचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनी काही दिवसांपूर्वी शिवसेनेचे उपनेते अजय बोरस्ते यांनी आयोजित केलेल्या ढोलताशा महोत्सवाच्या कार्यक्रमाला हजेरी लावली होती.

# आतिशी यांना मुख्यमंत्रीपदाची शपथ

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** अरविंद केजरीवाल यांच्यानंतर राजीनाम्यानंतर आतिशी यांनी दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे. दिल्लीचे नायब राज्यपाल व्ही.के. सक्सेना यांनी राज निवास येथे त्यांना मुख्यमंत्री पदाच्या गोपनीयतेची शपथ दिली. आतिशी या अरविंद केजरीवाल यांच्या सर्वात जवळच्या नेत्या मानल्या जातात. आतिशी यांच्या मंत्रिमंडळात ५ मंत्र्यांचा समावेश आहे.

यामध्ये सौरभ भारद्वाज, कैलाश गेहलोत, गोपाल राय, मुकेश अहलावत आणि इम्रान हुसेन या नावांचा समावेश आहे.

मुख्यमंत्री म्हणून शपथ घेण्याआधी आतिशी यांनी प्रस्तावित मंत्र्यांसह केजरीवाल यांची त्यांच्या घरी भेट घेतली. आतिशी यांनी २0२० मध्ये कालकाजी विधानसभा मतदारसंघातून विजय मिळवला होता. केजरीवाल यांच्या मंत्रिमंडळात त्या एकमेव महिला मंत्री होत्या.

# लालबागच्या राजाच्या चरणी 5 कोटींचे दान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** गणेशोत्सवाच्या दहा दिवसांमध्ये लालबागच्या राजाच्या चरणी ५ कोटी १६ लाख रुपये रोख रकमेचे दान आले आहे. साडेतीन किलो सोने आणि ६४ किलो चांदी यावेळी लालबागच्या राजाच्या चरणी दान करण्यात आली आहे.

लालबागचा राजा मुंबईतला प्रसिद्ध गणपती आहे. नवसाला पावणारा गणपती अशी लालबागचा राजा गणपतीची ख्याती आहे. दरवर्षी लालबागच्या राजाच्या चरणी भरभरून दान दिलं जातं. लालबागच्या राजाच्या दानपेटीत आलेल्या सोने आणि चांदीचा लिलाव केला जातो. त्यामधून जी रक्कम जमा होते, त्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात. तर राजाच्या चरणी दरवर्षी कोट्यावधी रुपयांचं दान भाविकांकडून केलं जातं.

लालबागच्या राजाचे दर्शन घेण्यासाठी गणेश चतुर्थीच्या एक दिवस आधीपासूनच भक्तांनी रांगेत उभं राहण्यास सुरुवात केली होती. पहिल्याच दिवशी भाविकांकडून केलेल्या दानामध्ये ४२ लाख रुपयांची रोख रकमेची नोंद करण्यात आली. तर १९८.५५० ग्रॅम सोने आणि ५४४० ग्रॅम चांदीच्या वस्तू राजाच्या चरणी अर्पण करण्यात आल्या होत्या. तर दुसऱ्या दिवशी लालबागच्या राजाच्या चरणी ६०, ६२, ००० रोख रक्कमेच्या दानाची नोंद करण्यात आली आहे. तर राजाला दुसऱ्या दिवशी १८३.४८० ग्रॅम सोन्याचे दान भाविकांकडून करण्यात आलं. तसेच ६,२२२ ग्रॅम चांदीच्या दानाची नोंद करण्यात आली. पहिल्याच दिवशी लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी जवळपास २० लाखांहून अधिक भाविकांनी दर्शन घेतले असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. पहिल्याच दिवशी सामान्य नागरिकांसह अनेक बॉलिवूड कलाकार, राजकीय नेत्यांनी लालबागच्या राजाचे दर्शन घेतले.

## तिरुपती मंदिरातील लाडू प्रसाद वादावर केली टिपण्णी

# माजी राष्ट्रपती म्हणतात, 'भेसळ हे पाप'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भेसळ हे तर पाप आहे. हिंदू धर्मग्रंथात अशा भेसळीला पापच म्हटले आहे. भाविकांसाठी प्रसाद हे श्रद्धेचे प्रतिक आहे. त्यात अशी भेसळ करणे निंदनीय आहे, अशी टिपण्णी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी तिरुपती मंदिरातील लाडू प्रसादात भेसळ केल्याच्या प्रकारावर केली आहे.

ते म्हणाले की, प्रसाद हा श्रद्धेचे प्रतिक आहे. पण त्यात भेसळ होत असल्याचे वृत्त आल्याने भाविक भक्तांच्या मनात शंका उत्पन्न होत आहे. वाराणसी दौऱ्यावर असताना, मी काशी विश्वनाथ मंदिराचे दर्शन करु शकलो नाही. पण काही सहकारी मंदिरात गेले होते आणि त्यांनी माझ्यासाठी आवर्जून प्रसाद आणला. त्याचवेळी माझ्यापर्यंत तिरुपती मंदिरातील प्रसादाच्या भेसळीचे वृत्त येऊन धडकले. हा वाद एका मंदिरापूरता मर्यादित नाही. ही प्रत्येक मंदिराची चिंता आहे.

माजी राष्ट्रपतींच्या या टिप्पणीमुळे आता हा वाद पुन्हा ऐरणीवर आला आहे. अनेक भाविकांनी प्रसादाच्या तपासाची मागणी केली आहे. तर अनेक देवस्थानांमधील प्रसाद यामुळे रडारवर आला आहे. भाजप नेत्या आणि केंद्रीय मंत्री शोभा करंदलाजे यांनी तिरुपती वादावर मत व्यक्त केले आहे. त्यांनी या सर्व प्रकाराची चौकशीची मागणी आंध्र प्रदेश सरकारकडे केली आहे. त्यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. या प्रकरणाचे गांभीर्य पाहता एक विशेष समिती गठीत करणे आवश्यक आहे. समितीच्या अहवालानंतर हे प्रकरण सीबीआयकडे सोपवण्याची मागणी त्यांनी केली.

### राजकारण तापले

● दरम्यान तिरुपती मंदिरातील प्रसादाच्या वादावरुन राजकारण अधिक तापले आहे. आंध्र प्रदेशामध्ये हा मुद्दा ऐरणीवर आला आहे. आता केंद्र सरकारने पण त्यात हस्तक्षेप केला आहे. सुरुवातीचे काही अहवाल समोर आल्यानंतर देवस्थानचे व्यवस्थापन करणारे सर्वच जण चौकशीच्या फेऱ्यात अडकले.





"आज विराटसाठी वाईट वाटलं. साहजिकच त्याला वाटले असेल की चेंडू बॅटला लागला नसेल. पण त्याने किमान गिलकडून जाणून घ्यायचे होते की, चेंडू स्टंपवर आदळत आहे का नाही? गिलने त्याला डीआरएस घेण्यास सागितले होते. परंतु विराटला आपल्या संघासाठी ३ डीआरएस राखून ठेवायचे होते, त्यामुळे तो निराश होऊन माघारी परतला." — संजय मांजरेकर

रॉयल्स कुटुंबाचा भाग बनणे हा बहुमान आहे. मला पुन्हा एकदा राहुलसोबत आणि आता युवा क्रिकेटपटूंसोबत काम करण्याची संधी मिळाली आहे. मी संघाची दृष्टी आणि रॉयल्ससाठी अव्वल दर्जाचे खेळाडू तयार करण्यात मदत करेन, ज्यामुळे संघाला आयपीएल विजेता बनविण्यात मदत होईल. — विक्रम राठोड



ऋषभ पंत **१०९** धावा



# भारताची विजयाकडे वाटचाल

## ऋषभ पंत अन् शुभमन गिलने मैदान गाजवले



**चेन्नई :** बांगलादेश विरुद्ध चेन्नई येथे सुरु असलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात टीम इंडिया विजयापासून ६ विकेट दूर आहे. बांगलादेश संघाने शनिवारी सामन्याच्या तिसऱ्या दिवशी खेळ थांबेपर्यंत दुसऱ्या डावात ४ विकेट गमावून १५८ धावा केल्या आहेत.

संघ सध्या ५१५ धावांच्या लक्ष्यापासून ३५७ धावांनी मागे आहे. कर्णधार नजमुल हसन शांतो ५१ धावा करून नाबाद तर शकीब अल हसन ५ धावा करून नाबाद आहे. भारताकडून रविचंद्रन अश्विनने तीन बळी घेतले. जसप्रीत बुमराहला १ विकेट मिळाली. तिसऱ्या दिवशी खराब प्रकाशामुळे १० कमी षटके टाकण्यात आली. बांगलादेशाच्या डावात आधी बराच वेळ खेळ थांबवण्यात आला आणि नंतर आजच्या दिवसाचा खेळ थांबवण्यात आला. तत्पूर्वी, भारताने ४ बाद २८७ धावांवर दुसरा डाव घोषित केला. शुभमन गिल (नाबाद ११९) आणि ऋषभ पंत (१०९) यांनी शतके झळकावली. गिलच्या कसोटी कारकिर्दीतील हे पाचवे आणि पंतच्या कारकिर्दीतील सहावे शतक आहे. भारताने पहिल्या डावात ३७६ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात बांगलादेशचा पहिला डाव १४९ धावांत आटोपला.

## आऊट नव्हता, तरीही कोहलीने DRS घेतला नाही

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**चेन्नई :** चेन्नईत सुरु असलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात भारताने बांगलादेशचा पहिला डाव 149 धावांत गुंडाळला आणि यानंतर दुसऱ्या दिवसअखेर तब्बल 308 धावांची भक्कम आघाडी मिळवली. पहिल्या डावात 376 धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना बांगलादेशची सुरुवात चांगली झाली नाही.

दुसऱ्या डावात मेहदी हसन मिराजच्या चेंडूवर विराट कोहली पायचीत बाद झाला होता. मेहदी हसन मिराजचा चेंडू विराट कोहलीच्या पॅडला लागला. त्यानंतर अम्पायरने त्याला बाद घोषित केले. विराट कोहलीने शुभमन गिलशी संवाद साधला, पण रिव्ह्यू न घेण्याचा निर्णय घेतला. मात्र, विराट कोहली पॅव्हेलियनमध्ये परतल्यानंतर रिप्लेमध्ये तो नाबाद असल्याचे स्पष्टपणे दिसून आले. विराट कोहलीच्या पॅडला लागण्यापूर्वी चेंडू बॅटला लागला होता, पण विराट कोहली आणि शुबमन गिल यांना याची कल्पना नव्हती.



ज्युनिअर गटातील विजेत्या महिला सायकलपाटू सह राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते जयदादा पवार, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष प्रताप जाधव आणि प्रवीण पाटील.

## सायकल स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलींचे वर्चस्व

**पुणे :** केंद्र सरकारच्या खेलो इंडिया वुमन्स लीग योजने अंतर्गत सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, एन्व्हार्यरमेंटल फोरम ऑफ इंडिया आणि क्रीडा जागृती यांच्या सौजन्याने बारामती येथे आयोजित रोड सायकल स्पर्धेत आज पहिल्या दिवशी महाराष्ट्राच्या मुलींनी स्पर्धेवर वर्चस्व राखले. मुलींच्या ज्युनिअर वयोगटात ... किमी अंतराच्या टाईम ट्रायल प्रकारात जुई नारकर (22.43.47) , आंतरराष्ट्रीय सायकलपटू सिद्धी शिर्के (22.51.53) आणि राष्ट्रीय सायकलपटू आकांक्षा म्हेत्रे (23.27.20) या महाराष्ट्राच्या मुलींनी अनुक्रमे सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदक पटकावले. या स्पर्धेचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवा नेते जयदादा पवार यांच्या हस्ते पार पडले याप्रसंगी सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष प्रताप जाधव, प्रविण पाटील, साईचे अॅडेंट अॅडीटीफिकेशन समितीच् सदस्य मनिष सहानी, सार्थक गंगावणे, मुख्य पंच धरमेंदर लांबा, आंतरराष्ट्रीय पंच सुदाम रोकडे, दिपाली पाटील, मिनाक्षी शिंदे, मिलींद झोडगे आदी मान्यवर हजर होते. आज सकाळी झालेल्या मुलींच्या सब ज्युनिअर वयोगटात १० किमी टाईम ट्रायल प्रकारात गोव्याच्या एन्जे माशा फर्नांडीस हिने महाराष्ट्राच्या मुलींना शह देताना सुवर्णपदक पटकावले. तिने १६.१९.८१४ वेळ नोंदवली. महाराष्ट्राच्या मानसी महाजन हिने १६ मि. ३२.१३५ से. वेळ नोंदवत रौप्य पदक आणि प्राजक्ता सुर्यवंशी हिने १६.४०.८७९ वेळ नोंदवत तिसरी तर श्रावणी परीट १६.४६.९१२ वेळ नोंदवत चौथ क्रमांक मिळवला. आज झालेल्या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ जयदादा पवार यांच्या हस्ते संपन्न झाला. याप्रसंगी एनव्हार्यमेंटल फोरम ऑफ इंडीयाचे पदाधिकारी, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडीयाचे उपाध्यक्ष प्रताप जाधव, प्रविण पाटील आदी मान्यवर हजर होते.

## लोयोला हायस्कूलची चमकदार कामगिरी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** टाटा ऑटोकॉम्प द्वारा संचालित लोयोला फुटबॉल चषक 2024 स्पर्धेमध्ये यजमान लोयोला हायस्कूलने शुक्रवारी सर्व सामने आरामात जिंकून दिवस गाजवला.

पाषाण येथील लोयोला एचएस मैदानावर सुरू असलेल्या स्पर्धेत 12 वर्षांखालील गटात लोयोला एचएसने मिलेनियम नॅशनल स्कूलवर 4-0 असा विजय मिळवला. शॉन आंग्रेने (७') संघाचे खाते उघडले. त्यानंतर शार्दुल मंधारने (९') त्यात आणखी भर घातली. शॉनने (१६') वैयक्तिक दुसरा तसेच नॅथॅनियल डेव्हिडने (२४') एक गोल करताना विजयात मोलाचा वाटा उचलला.

सकाळच्या सत्रातील अन्य सामन्यांमध्ये, लोयोला एचएसने अनुक्रमे 16 वर्षांखालील आणि 14 वर्षांखालील गटात मिलेनियम नॅशनल स्कूलवर सहज विजय मिळवले. १६ वर्षांखालील गटात हर्ष चंदन (30+1'), परम कुलकर्णी (36') यांनी महत्वपूर्ण गोल केले. नंतर, आदिराज सिंग (13'), समर्थ वाघ (15'), इव्हान अॅलेक्स (37') आणि जोनाथन मनोज (35') यांनी प्रत्येकी एक गोल करताना १४ वर्षांखालील गटातील विजयाला हातभार लावला. प्रतिस्पर्धी संघाकडून अर्चित पाटोळेने (46') एकमेव गोल केला

दरम्यान, प्रतिस्पर्धी इन्फंट जीझस संघ अनुपस्थित राहिल्याने विबग्योरला तिन्ही गटांमध्ये पुढे चाल देण्यात आली. परिणामी त्यांनी तीन गुण मिळवले.

## भूमिका, वृतिका, स्वधा, सई, प्रथमेश, संभव हे खेळाडू आघाडीवर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुणे जिल्हा बुद्धीबळ सर्कल (पीडीसीसी) यांच्या वतीने आयोजित व एआयसीएफ, एमसीए यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या एच2इ पॉवर सिस्टीम महाराष्ट्र राज्य 13 वर्षाखालील खुल्या व मुलीच्या निवड फिडे रेटेड बुद्धीबळ स्पर्धेत भूमिका वाघळे, वृतिका गामे,स्वधा दातीर, सई पाटील, प्रथमेश शेरला, संभव भटेवरा यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून 3 गुणांची कमाई केली.

कर्वे रोड येथील श्री गणेश सभागृह व अश्वमेध हॉल या ठिकाणी आजपासून सुरू झालेल्या या स्पर्धेत तिसऱ्या फेरीअखेर मुलींच्या गटात औरंगाबादच्या भूमिका वाघळेने नागपूरच्या वृत्तिका गामेचा ,तर मुंबई उपनगरच्या मायशा परवेझने पुण्याच्या आर्या कदमचा पराभव करून 3 गुण प्राप्त केले. यवतमाळच्या स्वधा दातीरने मुंबई उपनगरच्या प्रिशा मर्गजचा पराभव केला. पुण्याच्या सई पाटील हीने मुंबई उपनगरच्या अन्विता ठकारवर विजय मिळवत 3 गुण मिळवले.

मुलांच्या गटात पुण्याच्या प्रथमेश शेरलाने आपला शहर सहकारी इशान अर्जुन पीवायचा पराभव करून 3 गुण मिळवले. मुंबई शहरच्या आधारन लद्दडने पुण्याच्या सिद्धांत साळुंकेचा, तर पुण्याच्या संभव भटेवराने मुंबई शहरच्या हृदय मणियारचा पराभव करून 3 गुणांची कमाई केली.

स्पर्धेचे उदघाटन पीडीसीसीचे उपाध्यक्ष आश्विन त्रिमल, एमसीएचे मानद सचिव निरंजन गोडबोले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्पर्धा संचालक प्रकाश कुंटे, चीफ आरबीटर अथर्व गोडबोले, डेप्युटी चीफ आरबीटर आमरीश टल्लू, राजेंद्र शिदोरे आदी मान्यवर उपस्थित होते.



## अफगाणिस्तानचा इतिहास! आफ्रिकेच्या ६१ धावांत १० विकेट्स,

**नवी दिल्ली :** महाराष्ट्र अफगाणिस्ता क्रिकेट संघाने दुसऱ्या वन डे सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा १७७ धावांनी पराभव करून इतिहास रचला. वन डे क्रिकेटमधील अफगाणिस्तानचा हा सर्वात मोठा विजय ठरला. राशिद खानने त्याच्या वाढदिवसाला झालेल्या सामन्यात पाच विकेट्स घेण्याचा पराक्रम करताना संघाला तीन सामन्यांच्या वन डे मालिकेतत २-० असा विजय मिळवून दिला. अफगाणिस्तानने प्रथमच दक्षिण आफ्रिकेविरुद्ध द्विदेशीय मालिका जिंकली. हशमतुल्ला शाहिदीच्या अफगाणिस्तान संघाने दक्षिण आफ्रिकेला ३१२ धावांचे लक्ष्य दिले होते. याला प्रत्युत्तर देताना टेम्बा बवुमाचा संघ ५० षटकंही टिकू शकला नाही आणि ३४.२ षटकांत १३४ धावांवर सर्व फलंदाज तंबूत परतले. राशिदने १९ धावांत पाच विकेट घेतल्या. वाढदिवसाला वन डे क्रिकेटमध्ये पाच विकेट्स घेणारा तो जगातला पहिला गोलंदाज ठरला. यापूर्वी २००७ मध्ये आफ्रिकेच्या वेर्नोन फिलँडरने आयर्लंडविरुद्ध १२ धावांत ४ विकेट्स घेतल्या होत्या आणि ती सर्वोत्तक कामगिरी होती. स्टुअर्ट ब्रॉडने २०१० मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध ४४ धावांत ४ विकेट्स घेतल्या होत्या. रहमनुल्ला गुर्बाजच्या शतकाच्या जोरावर अफगाणिस्तान संघाने ४ बाद ३११ धावा केल्या. गुर्बाजनंतर आजमतुल्ला उमरजाईने ८६ धावांची तुफानी खेळी केली. रहमत शाहने ५० धावांची वादळी खेळी केली. अफगाणिस्तान संघाने दिलेल्या लक्ष्याला प्रत्युत्तर देताना दक्षिण आफ्रिकेने राशिद खान आणि नांगेयालिया खारोटे यांच्यासमोर शरणागती पत्करली.

## मालविकाची चायना ओपन बॅडमिंटन स्पर्धेतील स्वप्नवत वाटचाल संपुष्टात

**नवी दिल्ली :** ऑलिम्पिक कांस्यपदक विजेतीला धक्का देत आगेकूच करणाऱ्या भारताच्या मालविका बनसोड हिची चायना ओपन बॅडमिंटन स्पर्धेतील स्वप्नवत वाटचाल उपांत्यपूर्व फेरीत संपुष्टात आली. मालविकाचा जपानच्या अकाने यामागुचीकडून १०-२१, १६-२१ असा पराभव झाला. यामागुची मालविकापेक्षा अनुभवात मोठी आहे. पी. व्ही. सिंधूलाही गेल्या काही सामन्यांत यामागुचीला पराभूत करता आलेले नाही. यामागुची जागतिक क्रमवारीत आठव्या स्थानावर आहे. मालविकाविरुद्धच्या हा सामना तिने ३५ मिनिटांत जिंकला. यामागुचीविरुद्ध मालविकाचा हा सलग तिसरा पराभव आहे. मालविका यामागुचीसमोर आव्हान उभे करू शकली नाही, पहिल्या गेममध्ये ती ४-१२ असे पिछाडीवर पडली होती. त्यानंतर हा गेम यामागुचीने २१-१० असा एकतर्फी जिंकला. दुसऱ्या गेमममध्ये मात्र कमालीची चुरस झाली. मालविकाने यामागुचीला १५-१५ असे रोखले होते, पण या निर्णायक क्षणी यामागुचीने अनुभवाच्या जोरावर बाजी मारली.

### पीएमडीटीए-मानांकन एसकेटी आरटेंगो करंडक 8 व 10 वर्षाखालील ब्रॉन्झ सिरिज टेनिस 2024 स्पर्धेत

## अहान नार्गोळकर, रियानचा मानांकित खेळाडूंवर विजय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** पुणे मेट्रोपॉलिटन जिल्हा टेनिस संघटना(पीएमडीटीए) यांच्या तर्फे पीएमडीटीए-मानांकन एसकेटी आरटेंगो करंडक 8 व 10 वर्षाखालील ब्रॉन्झ सिरिज टेनिस 2024 स्पर्धेत अहान नार्गोळकर, रियान पाटील यांनी मानांकित खेळाडूंवर विजय मिळवत आजचा दिवस गाजवला.

डेक्कन जिमखाना येथील टेनिस कोर्टवर सुरू असलेल्या या स्पर्धेत 8 वर्षाखालील मुलांच्या गटात दुसऱ्या फेरीत बिगर मानांकित अहान नार्गोळकरने चौथ्या मानांकित स्वतेज दुधानेचा 5-3 असा तर, रियान पाटीलने आठव्या मानांकित आयुश मदनिकरचा 5-2 असा पराभव करून अनपेक्षित निकाल नोंदवला. सहाव्या मानांकित राजवीर बाबरने नील विजयवर्गीवर 5-3 असा विजय मिळवला.

मुलींच्या गटात उपांत्यपूर्व फेरीत अव्वल मानांकित युक्ता कुटेने इरा जोशीचा 5-1 असा सहज विजय मिळवला. चौथ्या मानांकित विरा परदेशीने नतालिया माधवचा 5-3 असा तर, तिसऱ्या मानांकित कायरा गोहिलने तारा महाजनचा 5-2 असा पराभव करून उपांत्य फेरी गाठली. दुसऱ्या मानांकित अन्वी साहूने आरना आवाडला 5-1 असे नमविले.

### भारतीय कबड्डी संघटनेवर बंदीची कारवाई

## जागतिक स्पर्धेत खेळता येणार नाही

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय पुरुष आणि महिला कबड्डी संघ २५-३० सप्टेंबर पासून इराणमध्ये सुरू होणाऱ्या सीनियर वर्ल्ड बीच कबड्डी चॅम्पियनशिप स्पर्धेत खेळू शकणार नाही. कारण, आंतरराष्ट्रीय कबड्डी महासंघाने भारतीय कबड्डी संघटनेवर ( AKFI) बंदीची कारवाई केली आहे. त्यामुळे भारतीय पुरुष व महिला संघांना कोणत्याची जागतिक स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.

आंतरराष्ट्रीय कबड्डी फेडरेशन (IKF)ने भारतीय हौशी कबड्डी फेडरेशन (AKFI)ला निलंबित केले आहे. भारतीय संघटनेतील अंतर्गत वादामुळे आंतरराष्ट्री महासंघाला हा निर्णय घ्यावा लागला. यामुळे जागतिक बीच कबड्डी चॅम्पियनशिप स्पर्धेसोबतच भारताला नोव्हेंबरमध्ये थायलंड येथे होणाऱ्या सहाव्या आशियाई इनडोअर स्पर्धेत भाग घेण्याची परवानगी दिली जाणार नाही.

गेल्या पाच वर्षांपासून न्यायमूर्ती एसपी गर्ग AKFI चा कारभार सांभाळत आहेत. परंतु AKFI न्यायालय-नियुक्त प्रशासकचा सहभागास नियमांचे उल्लंघन मानते.

### चौथ्या 'स्पार्टन मान्सुन लीग' अजिंक्यपद टी-२० क्रिकेट स्पर्धेत

## विस्ट्रॉन ऑप्टोइलेक्ट्रॉनिक्स्, पुणे रेंजर्स उपांत्य फेरीत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** स्पार्टन क्रिकेट क्लब तर्फे आयोजित चौथ्या 'स्पार्टन मान्सुन लीग' अजिंक्यपद टी-२० क्रिकेट स्पर्धेत विस्ट्रॉन ऑप्टोइलेक्ट्रॉनिक्स् आणि पुणे रेंजर्स क्रिकेट क्लब या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला.

सिंहगड रोडवरील कोद्रे फार्मस् क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेच्या उपांत्यपुर्व फेरीमध्ये सिद्धार्थ रोमन याने फटकावलेल्या ५३ धावांच्या जोरावर विस्ट्रॉन ऑप्टोइलेक्ट्रॉनिक्स्ने रायझिंग बॉईज क्लबचा १० गडी राखून सहज पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या रायझिंग बॉईज क्लबने १८.१ षटकामध्ये १०५ धावा जमविल्या. शाम बिष्णोई (३६ धावा) आणि सुरज झा (२३ धावा) यांनी धावांचे योगदान दिले. विस्ट्रॉन ऑप्टोइलेक्ट्रॉनिक्स्ने हे लक्ष्य ८.३ षटकात सहज पूर्ण केले. सिद्धार्थ रोमन याने नाबाद ५३ धावांची तर, स्वप्निल गुगळे याने नाबाद ५१ धावांची खेळी केली. या दोघांनी सहज लक्ष्य गाठून संघाला अंतिम चार संघांमध्ये स्थान मिळवून दिले.

कपिल कुर्लेकर याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर पुणे रेंजर्स क्रिकेट क्लबने ब्रेव्हहार्ट क्रिकेट क्लबचा ५ गडी राखून पराभव करत उपांत्य फेरीत प्रवेश केला. पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या ब्रेव्हहार्ट क्रिकेट क्लबचा डाव ९५ धावांवर मर्यादित राहीला. पुणे रेंजर्सच्या जलदगती गोलंदाज कपिल कुर्लेकर याने २१ धावांमध्ये ३ गडी टिपले. कपिलसह दुसऱ्या बाजुने सुमित दिघे (३-२१), देव चौधरी (२-१६) आणि अम्रित अलोक (२-१६) यांनीही अचूक गोलंदाजी केले. हे लक्ष्य पुणे रेंजर्स क्रिकेट क्लबने ९.३ षटकात व ५ गडी गमावून पूर्ण केले.